जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन

### आंदोलन करणाऱ्या २० ते ३० महिलांवर गुन्हा दाखल

नगर –जिल्हाधिकाऱ्यांनी लागू केलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करून पोलीस अधीक्षक कार्यालय अहिल्यानगर येथे १ जुलै रोजी विनापरवाना जाहीर घोषणाबाजी आणि आंदोलन केल्याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात माजी नगरसेविकेसह इतर २० ते ३० महिलांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्याचे पो.हे. कॉ. अजय सदाशिव गव्हाणे यांनी फिर्याद दिली आहे. जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये जिल्ह्यात १९ जून ते २ जुलै या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले होते. असे असतानाही या आंदोलक महिलांनी या आदेशाचे सर्रास उल्लंघन केले. त्यांनी पोलीस अधिक्षक कार्यालयाच्या परिसरात विनापरवाना नाझिया इलाही खान यांच्या प्रतिमेचे प्रदर्शन करत जाहीर घोषणाबाजी केली. सरकारी आदेश पायदळी तुडवल्याचे निष्पन्न झाल्याने पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

याप्रकरणी पोलिसांनी माजी नगरसेविका शेख नसीम खानसाहेब, शेख मुन्नी अयाज, शेख निदा जावेद, शेख सुमय्या झाकीर, आयशा खान आणि इतर २० ते ३० महिला आरोपींच्या विरोधात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) प्रमाणे गुन्हा नोंदवला आहे.

## नॉर्वेमधील जागतिक ‘युरोपियन समर रिसर्च स्कूल’साठी अहिल्यानगर युवा वास्तुविशारद आमेर शेख यांची निवड



नगर – नॉर्वे येथील Ostfold University of Applied Sciences (ऑस्टफोल्ड युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाईड सायन्सेस) येथे आयोजित करण्यात आलेल्या SNUG European Summer Research School 2026 (एसएनयूजी युरोपियन समर रिसर्च स्कूल – ऊर्जाक्षम इमारतींसाठी स्मार्ट व शाश्वत इमारत आवरणांवरील संशोधन प्रशिक्षण) या आंतरराष्ट्रीय कार्यक्रमासाठी युवा वास्तुविशारद आर्किटेक्ट आमेर अख्तर शेख यांची जागतिक स्तरावर निवड झाली. या माध्यमातून त्यांनी अहिल्यानगर तसेच भारताचे प्रतिनिधित्व करत शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

युरोपियन युनियनच्या SNUG Project (शाश्वत बांधकाम संशोधन प्रकल्प) अंतर्गत २२ ते २६ जून या कालावधीत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. Circular Construction (परिपत्रक बांधकाम पद्धती), Energy Efficient Built Environment (ऊर्जाक्षम बांधकाम पर्यावरण) आणि Digital Workflows (डिजिटल कार्यपद्धती) या भविष्यातील वास्तुकला व बांधकाम क्षेत्रासाठी महत्त्वाच्या विषयांवर सखोल प्रशिक्षण देण्यात आले.

विशेष म्हणजे, या समर रिसर्च स्कूलसाठी जगभरातील Master's Students (पदव्युत्तर विद्यार्थी), PhD Researchers (पीएच. डी. संशोधक) तसेच दहा वर्षांहून अधिक संशोधन व औद्योगिक अनुभव असलेल्या व्यावसायिकांकडून अर्ज मागविण्यात आले होते. अत्यंत कठोर निवड प्रक्रियेनंतर केवळ २० सहभागींची अंतिम निवड करण्यात आली.

या कार्यक्रमामध्ये चार प्रमुख संशोधन मॉड्यूल्सद्वारे आधुनिक शाश्वत वास्तुकलेच्या विविध पैलूंवर प्रशिक्षण देण्यात आले.

Life Cycle Assessment (इमारतीच्या संपूर्ण जीवनचक्रातील पर्यावरणीय परिणामांचे मूल्यांकन) आणि Life Cycle Costing (LCC) (संपूर्ण जीवनचक्रातील आर्थिक खर्चाचे विश्लेषण) यांच्या साहाय्याने बांधकाम साहित्याची पर्यावरणीय व आर्थिक उपयुक्तता कशी मोजावी याचे प्रशिक्षण देण्यात आले.

Advanced Material Science (प्रगत पदार्थ विज्ञान) अंतर्गत Bio-based Insulation Materials (नैसर्गिक जैवाधारित उष्णतारोधक साहित्य) जसे की Hemp (भांग तंतू), Wood Fiber (लाकडी तंतू) आणि Mycelium (बुरशीच्या तंतूंपासून तयार होणारे जैवसाहित्य) यांच्या उष्णता व आर्द्रता कार्यक्षमतेचा अभ्यास करण्यात आला.

तसेच Digital Modeling (डिजिटल मॉडेलिंग) आणि Generative Design (कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित स्वयंचलित डिझाइन प्रक्रिया) यांच्या साहाय्याने इमारतींच्या ऊर्जा कार्यक्षमतेचे संगणकीय विश्लेषण करण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या SNUG Digital Tool Assistant (डिजिटल डिझाइन सहाय्यक) या अत्याधुनिक प्रणालीचाही प्रत्यक्ष वापर सहभागी विद्यार्थ्यांनी केला.

या संपूर्ण प्रशिक्षणाचा समारोप Icebox Challenge (उष्णतारोधक कार्यक्षमतेची स्पर्धात्मक चाचणी) या आंतरराष्ट्रीय स्पर्धेने झाला. स्पर्धेत सहभागी संघांना अत्यंत कार्यक्षम उष्णतारोधक गुणधर्म असलेले लघु गृह मॉडेल तयार करून त्याची कार्यक्षमता सिद्ध करायची होती. विविध देशांतील चार संघांमध्ये झालेल्या या स्पर्धेत आर्किटेक्ट आमेर अख्तर शेख यांच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करत Icebox Challenge Award पटकावला. त्यामुळे या आंतरराष्ट्रीय प्रशिक्षणात भारतीय प्रतिनिधींनी विशेष छाप पाडल्याचे अधोरेखित झाले.

या प्रशिक्षणादरम्यान विविध देशांतील संशोधक, प्राध्यापक आणि वास्तुविशारदांसोबत संवाद साधण्याची संधी मिळाल्याने शाश्वत वास्तुकला, हवामानानुरूप इमारत रचना आणि आधुनिक बांधकाम तंत्रज्ञानाबाबत जागतिक दृष्टिकोन विकसित झाला. विविध देशांमध्ये वापरल्या जाणाऱ्या संशोधनाधारित तंत्रज्ञानाचा अभ्यास भारतीय परिस्थितीत कसा उपयुक्त ठरू शकतो, यावरही व्यापक चर्चा झाली.

आर्किटेक्ट आमेर अख्तर शेख हे गेल्या दहा वर्षांपासून वास्तुकला क्षेत्रात कार्यरत असून प्रामुख्याने Healthcare Architecture (आरोग्यसेवा इमारत नियोजन) आणि Sustainable Residential Architecture (शाश्वत निवासी वास्तुकला) या क्षेत्रात कार्य करीत आहेत.



**मनपा प्रभाग १ मध्ये ‘एक कुटुंब – एक झाड’ उपक्रमाला प्रारंभ; घरोघरी जाऊन नागरिकांना १० ते १५ फूट उंच आंब्याचे झाड भेट**

मनपा प्रभाग क्रमांक १ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्या संकल्पनेतून ‘एक कुटुंब – एक झाड’ या अभिनव उपक्रमाला प्रारंभ करण्यात आला आहे. या उपक्रमाअंतर्गत नावनोंदणी केलेल्या प्रत्येक कुटुंबाला घरोघरी जाऊन १० ते १५ फूट उंचीचे आंब्याचे झाड भेट म्हणून दिले जाणार असून पर्यावरण संवर्धनासोबतच फळझाडांचे संगोपन करण्याची लोकचळवळ उभी करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. (छाया – लहू दळवी)

## गोमांस विक्री करणाऱ्याला पोलिसांनी नगरमध्ये पकडले; गुन्हा दाखल

नगर – महाराष्ट्र राज्यामध्ये गोवंश जातीचे मांस विक्री करण्यास कायदेशीर बंदी असतानाही, बेकायदेशीरपणे गोमांस बाळगून त्याची विक्री करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका इसमावर तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तोफखाना पोलिसांनी कोठला येथील झोपडपट्टीत एका पत्र्याच्या शेडमध्ये छापा टाकून १६ हजार ४०० रुपये किमतीचे गोमांस, लोखंडी सत्तूर आणि सुरा असा मुद्देमाल जप्त केला आहे.

कोठला येथील झोपडपट्टीतील एका पत्र्याच्या शेडमध्ये गोमांस विक्री सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी १ जुलै रोजी दुपारी ३ च्या सुमारास घटनास्थळी छापा टाकला असता, आरोपी सोहेल अफजल कुरेशी (वय १९, रा. पिरशाह खुंट, अहिल्यानगर) हा गोमांसाची विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगताना रंगेहात मिळून आला.

या प्रकरणी पोलिसांनी आरोपी सोहेल कुरेशी याच्या विरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम २७१, २२३ सह महाराष्ट्र पशु संवर्धन अधिनियम १९९५ चे कलम ५(अ) (क), ९ (प्राणी संरक्षण कायदा) प्रमाणे गुन्हा नोंदवला आहे.

## शेडची लोखंडी जाळी कापून बोकड आणि शेळ्यांची चोरी

नगर – घराच्या शेजारील शेडमधून अज्ञात चोरट्यांनी शेडची लोखंडी जाळी कापून आत प्रवेश करत ५५ हजार रुपये किंमतीची पाळीव जनावरे चोरून नेली आहेत. त्यामध्ये काळ्या रंगाचा एक बोकड तसेच चार पाठी (शेळ्या) यांचा समावेश आहे. नगर तालुक्यातील कवडेवाडी (घोसपुरी) येथे ३० जून रोजी रात्री ११.३० ते १ जुलै रोजी सकाळी ७ या कालावधीत ही घटना घडली. याबाबत भाऊसाहेब पंडित कवडे (वय ३३, रा. कवडेवाडी, घोसपुरी, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे.फिर्यादी यांच्या राहत्या घराशेजारी असलेल्या मोकळ्या शेडमध्ये ही जनावरे बांधलेली होती. रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी कशाच्या तरी सहाय्याने शेडची लोखंडी जाळी कापली आणि आत बांधलेले ५५ हजार रुपये किमतीचे बोकड व ४ पाठी चोरून नेल्या. हा प्रकार सकाळी उघडकीस आल्यानंतर त्यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## अण्णा हजारेंच्या उपोषणाबरोबर लोकशाहीविरोधी ‘नरेंद्र मोदी सरकारची उलटी गिनती’ सुरू होईल



नगर – माहितीचा अधिकार कायदा, २००५ हा भारतीय लोकशाहीचा आधारस्तंभ असून, शासनातील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि जनतेच्या माहितीच्या अधिकाराचे प्रभावी संरक्षण करणारा कायदा आहे. मात्र, महाराष्ट्र शासनाने माहिती अधिकार कायद्यांतर्गत लागू केलेले २०२६ चे नवीन नियम हे नागरिकांच्या मूलभूत लोकशाही अधिकारांवर गदा आणणारे आहे. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी या नव्या नियमांविरोधात आमरण उपोषण सुरु केल्यास तो दिवस लोकशाहीविरोधी मोदी सरकारची उलटी गिनती सुरु करणारा दिवस ठरणार असल्याचे पीपल्प हेल्पलाईन व भारतीय जनसंसदने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी या नव्या नियमांविरोधात आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. त्यांच्या आंदोलनाला संपूर्ण पाठिंबा देत, हे आंदोलन केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता देशभरातील लोकशाहीवादी शक्तींना एकत्र आणणारे राष्ट्रीय जनआंदोलन ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. लोकशाहीच्या रक्षणासाठी हा निर्णायक लढा ठरेल आणि याच आंदोलनातून लोकशाहीविरोधी धोरणांविरोधात व्यापक जनमत तयार होईल, असेही संघटनेने स्पष्ट केले आहे.

पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. कारभारी गवळी म्हणाले, माहितीचा अधिकार हा केवळ कायदा नसून तो जनतेच्या हातातील लोकशाहीचा दिवा आहे. शासनाच्या कामकाजावर नागरिकांची नजर राहावी, भ्रष्टाचाराला आळा बसावा आणि प्रशासन जनतेपुढे उत्तरदायी राहावे, यासाठी माहिती अधिकार अत्यंत आवश्यक आहे. हा अधिकार कमकुवत करणे म्हणजे लोकशाहीच्या मुळावर घाव घालण्यासारखे आहे. सरकार लोकशाहीच्या माध्यमातून सत्तेवर येते; परंतु त्याच सरकारने माहिती अधिकारावर निर्बंध आणून जनतेपासून माहिती लपविण्याचा प्रयत्न केला, तर ते संविधानाच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत असल्याचे गवळी यांनी सांगितले. संविधानिक लोकशाही ही सत्तेला जनतेसमोर उत्तरदायी ठेवते, तर माहिती लपविण्याची प्रवृत्ती लोकशाहीच्या विरोधात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नवीन नियमांमुळे माहिती मिळविण्याची प्रक्रिया अधिक गुंतागुंतीची होणार असल्याचा आरोपही संघटनेने केला आहे. अपील प्रक्रिया कठीण करणे, नागरिकांना तांत्रिक अडचणींमध्ये अडकविणे, प्रतिनिधी किंवा वकिलांच्या सहाय्यापासून दूर ठेवणे आणि माहिती मिळविण्याचा खर्च वाढविणे हे सर्व उपाय नागरिकांच्या माहितीच्या अधिकाराला मर्यादित करणारे असून, त्यातून भ्रष्टाचार, मनमानी आणि नोकरशाहीला संरक्षण मिळण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. या नव्या नियमांविरोधातील आंदोलनासाठी अशोक सब्बन, ॲड. सुरेश लगड, ॲड. आनंद सूर्यवंशी, ॲड. शिवाजी कोतकर, ॲड. रवींद्र रणसिंग आणि ॲड. चंद्रशेखर उबाळे यांच्यासह प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, शाहीर कान्हू सुंबे, ॲड. लक्ष्मणराव पोकळे, वीरबहादूर प्रजापती, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, धनंजय मडके, कैलास पठारे, ॲड. विद्या शिंदे, राजेंद्र कर्डिले, दिलीप घुले आणि प्रकाश गोसावी आदी प्रयत्नशील असल्याचे संघटनेने सांगितले आहे.

## राळेगणसिद्धीत ३ जुलै रोजी माहिती अधिकार कायद्यातील बदलाच्या नियमावलीचे ग्रामस्थ करणार प्रतिकात्मक दहन

### उपोषण केल्यास अण्णा हजारे यांच्या प्रकृतीला धोका

नगर – माहितीचा अधिकार कायद्याच्या नव्या नियम ावलीविरोधात ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी ५ जुलैपासून बेमुदत उपोषणाचा इशारा दिला आहे. त्या पार्श्वभूमीवर २ जुलै रोजी पुण्यातील रुबी हॉल क्लिनीकमध्ये अण्णा हजारे यांच्या प्रकृतीची तपासणी करण्यात आली. डॉ. ग्रॅण्ड यांनी ही तपासणी केली. अण्णांनी उपोषण केल्यास त्यांच्या प्रकृतीला धोका होऊ शकतो, असे डॉ. ग्रॅण्ड यांनी सांगितले आहे. त्यामुळे अण्णांनी उपोषण करु नये, यासाठी राळेगणसिद्धी ग्रामस्थ एकवटले आहे. राळेगणसिद्धी ग्रामस्थांनी ३ जुलै रोजी सकाळी १० वाजता गावच्या मुख्य चौकात माहिती अधिकार कायदा नियमावलीचे प्रतिकात्मक दहन करण्याचा इशारा दिला आहे.

अण्णा हजारे उपोषणावर ठाम आहेत. मात्र, सरकारकडून अद्याप कोणताही तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करण्यात आलेले नाहीत. तथापि, या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर अण्णा हजारे यांची २ जुलै रोजी पुण्यातील रुबी हॉस्पिटलमध्ये संपूर्ण आरोग्य तपासणी करण्यात आली. यात तपासणीत अण्णा हजारे यांच्या डोक्यात रक्ताच्या गाठी झालेल्या आहेत. त्यामुळे रक्तपुरवठा कमी प्रमाणात होत आहे. तसेच त्यांना रक्तदाबाचाही त्रास आहे. अशा स्थितीत अण्णांनी जर उपोषण केले तर त्यांच्या प्रकृतीला धोका होऊ शकतो, असा इशारा डॉ. ग्रॅण्ड यांनी दिला असल्याचे अण्णांचे कार्यकर्ते ॲड. श्याम असावा यांनी सांगितले.

दरम्यान डॉक्टरांनी अण्णा हजारे यांना उपोषण करण्यास मनाई केल्यानंतरही अण्णा उपोषणावर ठाम आहेत. त्याम ुळे ग्रामस्थ चिंतेत असून सरकारविरोधातील रोष वाढत आहे. शासनाने १२ जून २०२६ रोजी माहितीचा अधिकार कायद्याची नवी नियमावली लागू करून हा कायदा कमकुवत करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही नियमावली सामान्य नागरिकाच्या माहिती मिळविण्याच्या म ूलभूत अधिकारावर घाला असल्याचा दावा करत ती तातडीने रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. याच मागणीसाठी ९० वर्षीय अण्णा हजारे हे ५ जुलै २०२६ पासून पुन्हा बेमुदत उपोषणाला बसणार आहेत. अण्णांच्या वयाचा विचार करता त्यांना पुन्हा उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागत असल्याबद्दल गावकऱ्यांनी तीव्र खंत व्यक्त केली असून, सरकारने त्याआधीच निर्णय घेऊन उपोषणाची वेळ येऊ देऊ नये, अशी भावना व्यक्त करण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर ३ जुलै रोजी सकाळी १० वाजता राळेगणसिद्धीच्या मुख्य चौकात माहितीचा अधिकार कायद्याच्या १२ जून २०२६ च्या नियमावलीचे प्रतिकात्मक दहन करण्यात येणार आहे. या आंदोलनात गावातील प्रत्येक कुटुंब, युवक, माता–भगिनी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन जनआंदोलनाची सुरुवात ऐतिहासिक करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## सतीश ठाकूर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – सतीश प्रभाकर ठाकूर (वय ६५, रा. केडगाव, हल्ली मुक्काम पुणे) यांचे २९ जून रोजी रात्री १० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर पुणे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, मुलगी, जावई असा परिवार आहे. केडगावमधील वृत्तपत्र विक्रेते जयदीप ठाकूर यांचे ते चुलते होत.

## दिपक बडदे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – भिंगार येथील दिपक बडदे (वय ६८) यांचे १ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचा अंत्यविधी गुरुवारी भिंगार येथील अमरधाम येथे झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ भाऊजाय, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

ते हरदिन मॉर्निंग ग्रुपचे सदस्य होते. ग्रुपच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, पर्यावरण व आरोग्य चळवळीत भरीव योगदान दिले. हसतमुख आणि मनमिळावू स्वभावाने ते सर्वांना परिचित होते.

हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने सकाळी भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क येथे दिपक बडदे यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

## मतदार यादी पुनरीक्षणाला वेग; नगरमध्ये बीएलओंच्या घरभेटी सुरू; शालेय जबाबदारी सांभाळत शिक्षकांकडून मतदार पुनरीक्षणाचे काम

### सकाळी ७ ते मध्यरात्रीपर्यंत बीएलओंची धावपळ; नागरिकांनी गणना प्रपत्र भरून सहकार्य करण्याचे प्रशासनाचे आवाहन

नगर – शहर विधानसभा मतदारसंघात मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाला वेग आला असून, बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) यांच्या घरभेटींची मोहीम जोरात सुरू आहे. मतदार यादी अद्ययावत, अचूक आणि त्रुटीरहित करण्यासाठी बीएलओ सकाळपासून रात्री उशिरापर्यंत नागरिकांच्या घरी जाऊन गणना प्रपत्र भरून घेत आहेत. मतदारांची ओळख, राहण्याचा पत्ता, आवश्यक कागदपत्रे तसेच इतर तपशीलांची पडताळणी करून माहिती संकलित केली जात आहे.

या मोहिमेत मोठ्या प्रमाणावर शिक्षक बीएलओ म्हणून कार्यरत आहेत. प्रशासनाच्या वतीने बीएलओचे काम करणाऱ्या शिक्षकांना कार्यमुक्तीचे आदेश दिले असले तरी अनेक शाळांमध्ये शिक्षक संख्या अत्यल्प आहे. त्यामुळे शिक्षकांना बीएलओचे काम करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये यासाठी देखील शाळेतील अध्यापनाची जबाबदारी पार पाडावी लागत आहे. अनेक शिक्षक सकाळी सात वाजल्यापासून घराबाहेर पडून दिवसात काही वेळ शालेय कामकाज सांभाळत रात्री बारा वाजेपर्यंत मतदार पुनरीक्षणाचे काम करत असल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे. त्यामुळे अध्यापन आणि मतदार पुनरीक्षण अशा दुहेरी जबाबदाऱ्या शिक्षकांवर पडल्या असून, त्यांची मोठी कसरत सुरू आहे.



शहर विधानसभा मतदारसंघात मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाला वेग आला असून, बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) यांच्या घरभेटींची मोहीम जोरात सुरू आहे.

मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेअंतर्गत प्रत्येक मतदाराची माहिती अद्ययावत करणे, नवीन पात्र मतदारांची नोंद करणे तसेच मृत, स्थलांतरित किंवा अपात्र मतदारांची माहिती निश्चित करणे हे उद्दिष्ट आहे. यासाठी बीएलओंना नागरिकांच्या सहकार्याची अत्यंत आवश्यकता असून, घरभेटीदरम्यान आवश्यक माहिती व कागदपत्रे उपलब्ध करून देण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, ज्या मतदारांकडून गणना प्रपत्र भरून दिले जाणार नाही किंवा आवश्यक माहिती उपलब्ध होणार नाही, अशा मतदारांची नावे प्रारूप मतदार यादीत समाविष्ट होण्यास अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने ही प्रक्रिया गांभीर्याने घेत बीएलओंना वेळेवर माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

मतदानाचा हक्क अबाधित ठेवण्यासाठी मतदार यादीतील माहिती अचूक असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे बीएलओ घरभेटीसाठी आल्यानंतर त्यांना योग्य माहिती देणे, आवश्यक कागदपत्रे दाखविणे आणि गणना प्रपत्र तातडीने भरून देणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### चालणे 'सर्वोत्तम व्यायाम'

चालणे हा सर्वात सोपा, स्वस्त आणि कोणत्याही वयात करता येणारा व्यायाम आहे. यासाठी जिमची फी नाही, महागड्या मशीनची गरज नाही आणि दुखापतीची भीतीही कमी आहे. आधुनिक वैद्यकीय शास्त्रानेही चालण्याला 'संपूर्ण शरीराचा व्यायाम'चा दर्जा दिला आहे. रोज ३० मिनिटे वेगाने चालल्याने हृदय मजबूत होते, रक्ताभिसरण सुधारते आणि हृदयविकाराचा धोका ३०% ने कमी होतो. यातील खास गोष्ट म्हणजे चालण्याने गुडघ्यांवर ताण येत नाही उलट सांध्यातील वंगण वाढते आणि सांधेदुखी कमी होते. वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी चालणे उत्तम आहे, कारण एक तास चालल्याने २००-३०० कॅलरीज जळतात. मधुमेह, बीपी, कोलेस्ट्रॉल यांसारख्या आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी डॉक्टर पहिला सल्ला चालण्याचाच देतात.मानसिक आरोग्यासाठीही चालणे वरदान आहे. सकाळी मोकळ्या हवेत चालल्याने तणाव, नैराश्य कमी होते आणि मेंदूला ऑक्सिजनचा पुरवठा वाढून स्मरणशक्ती सुधारते. पचनक्रिया चांगली होण्यासाठी, गॅस-ॲसिडिटी टाळण्यासाठी जेवणानंतर १०० पावले चालणे फायदेशीर ठरते. हाडे मजबूत करण्यासाठी, ऑस्टिओपोरोसिस टाळण्यासाठी चालणे आवश्यक आहे कारण यामुळे हाडांची घनता वाढते. झोप न येण्याच्या समस्येवर संध्याकाळी चालणे हा साधा उपाय आहे.

## पाककला

### खमंग तिखट कुरकुरीत भेळ

**साहित्य** : मुरमुरे २ वाटी, बारीक चिरलेला कांदा १ मोठा, बारीक चिरलेला टोमॅटो १, उकडलेला बटाटा १ मध्यम, बारीक शेव १ वाटी, भाजलेले शेंगदाणे १/२ वाटी, बारीक चिरलेली काकडी १/२, ओली लसूण-हिरवी मिरची चटणी २ चमचे, गोड चिंचेची चटणी २ चमचे, लाल तिखट १ चमचा, चाट मसाला १ चमचा, जिरे पावडर १/२ चमचा, काळे मीठ १/२ चमचा, लिंबाचा रस १ चमचा, बारीक चिरलेली कोथिंबीर २ चमचे, तळलेली मिरची २

**कृती** : एका मोठ्या परातीत मुरमुरे घ्या. त्यात बारीक चिरलेला कांदा, टोमॅटो, काकडी आणि कुस्करलेला उकडलेला बटाटा घाला. वरून भाजलेले शेंगदाणे आणि बारीक शेव घाला. आता ओली लसूण-मिरची चटणी, गोड चिंचेची चटणी घालून मिक्स करा. त्यात लाल तिखट, चाट मसाला, जिरे पावडर, काळे मीठ घालून सगळे एकजीव करा. शेवटी लिंबाचा रस पिळून बारीक चिरलेली कोथिंबीर घाला. भेळ लगेच सर्व्ह करा नाहीतर मऊ पडेल. वरून जास्त शेव, कोथिंबीर आणि तळलेली मिरची घालून झणझणीत सर्व्ह करा.

## वास्तू

### टाकीखालील स्टॅण्डची निगा

* टाकीखाली लोखंडी अँगलचा स्टँड नको. लोखंडावर गंज चढतो आणि पाणी दूषित होते. त्याऐवजी सिमेंटचा चौथरा बांधा. तो मजबूत व दीर्घकाळ टिकतो.

* टाकीचे झाकण नेहमी घट्ट बंद असावे. उघडी टाकी राहूची कारक आहे. यामुळे घरात आजारपण, नकारात्मक विचार आणि मानसिक अस्वस्थता वाढते.

* टाकीतून बाहेर पडणारी मुख्य पाइपलाइन उत्तर किंवा पूर्व दिशेने जावी. दक्षिण किंवा पश्चिमेकडे पाणी वाहून जाणे खर्च वाढवते. टाकीची भिंत व शौचालयाची भिंत एक नसावी.

## सौंदर्य

* सकाळी उठल्यावर स्वच्छ कपड्यात बर्फाचा खडा गुंडाळून चेहऱ्यावर १ मिनिट फिरवा. याने रक्ताभिसरण वाढते, पोर्स टाइट होतात, चेहऱ्यावर तात्काळ ग्लो येतो व मेकअप बेस चांगला बसतो.

* घाणेरड्या ब्रशमुळे बॅक्टेरिया चेहऱ्यावर जातात व मुरुमे होतात. महिन्यातून एकदा बेबी शॅम्पूने ब्रश धुवून उन्हात वाळवा.

## सल्ला

* जुनी टूथपेस्ट व मऊ कापड घेऊन भांड्यावर २ मिनिट चोळा. नंतर कोमट पाण्याने धुवा. महागड्या सिल्व्हर पॉलिशपेक्षा स्वस्त व बेस्ट उपाय आहे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. ३ जुलै २०२६

**संकष्ट चतुर्थी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, निज ज्येष्ठ कृष्णपक्ष, श्रवण ११|४७, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : नोकरदार व्यक्तींसाठी स्थिती अनुकूल राहील. राजकीय कार्ये पूर्ण होतील.

**वृषभ** : लेखन कार्यातील अडचणी दूर होतील. दिवस आनंदात जाईल. दिवस संमिश्र जाईल.

**मिथुन** : आरोग्य बरे राहील. सर्जनशील व्यक्तींना वाव मिळेल.

**कर्क** : मानसिक स्थिरता वाढेल. मान-सन्मानात वाढ होईल. पुर्वसुकृत फळास येवून अर्धवट राहिलेली सरकारी कामे पूर्ण होतील.

**सिंह** : ध्येय साध्य करण्यात पूर्ण यश मिळेल. जुन्या मित्र-मैत्रिणींची भेट होईल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**कन्या** : आरोग्य उत्तम राहील. काहीकाळ कठीण गेल्यानंतर यश मिळेल. नोकरीत चांगला काळ राहिल.

**तूळ** : आपण पूर्वीपासून आपल्या मनात असलेल्या योजनेबद्दल अतिउत्साही असाल.

**वृश्चिक** : आपल्या आवडी-निवडींप्रमाणे कार्य करण्यासाठी आजचा दिवस सर्वांत उत्तम आहे.

**धनु** : आर्थिक नुकसानीची शक्यता आहे. अडीअडचणीत असलेल्यांना मदत केल्यास तुमचे काम लवकर पूर्ण होईल.

**मकर** : जर आपणास आपले निवासस्थान बदलण्याची इच्छा असेल तर आजचा दिवस उत्तम आहे.

**कुंभ** : व्यापाऱ्यांसाठी परिस्थिती साधारण. जोडीदाराशी वादविवाद टाळा.

**मीन** : आपल्या कार्यातील अडचणी दूर होतील. अधिकाऱ्यांकडून कामे करवू शकाल. मागील उधारी वसुल होईल.

## फिल्मीचक्कर क्र. १२४३ सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | ■ | २ | ■ | ३ | |
| | ■ | ■ | ४ | | | | ■ |
| ५ | | ६ | ■ | | ■ | ७ | ८ |
| | ■ | ९ | | | ■ | ■ | |
| १० | | | ■ | ■ | ११ | १२ | ■ |
| | ■ | | ■ | ■ | ■ | | ■ |
| | ■ | १३ | | १४ | | | १५ |
| | ■ | | ■ | | ■ | १६ | |

**आडवे शब्द :-** १) ऋषी कपूर, शाहरूखखान, दिव्या भारती, अमरीश पुरी, सुषमा सेठ यांचा एक चित्रपट ३) ++ मचाये शोर (चित्रपटाचे नाव) ४) अमोल ++++ (अभिनेता) ५) जितेंद्र, हेमामालिनी, प्रेम चोप्रा यांचा एक चित्रपट ७) ++ कमल (चित्रपटाचे नाव) ९) सारा +++ हसीनोंका दिवाना (गाणे) १०) +++ वही जो पिया मन भाये (चित्रपटाचे नाव) ११) ++ स्टोरी (चित्रपटाचे नाव) १३) ++ ++ ++ काटे काले कौव्वेसे डरीयो (चित्रपटाचे नाव) १६) नाटक किंवा चित्रपटात भूमिका करणारा

**उभे शब्द :-** १) शाहरूखखान, काजोल, अमरीश पुरी यांचा एक गाजलेला चित्रपट २) दिदी तेरा देवर दीवाना है राम कुडीयों को ++ ++ (गाणे) ३) यात नितू सिंगची मुख्य भूमिका आहे ६) ++++ ++ मत बोलो खुदा के पास जाना है (गाणे) ८) ++ मंगेशकर (प्रसिद्ध गायिका) १२) ++ ++ थी (चित्रपटाचे नाव) १४) ++ राधा बोल (चित्रपटाचे नाव) १५) ++ पाहते पुनवेची (मराठी चित्रपटाचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : चूक करणे गुन्हा नाही, पण चूक सुधारली नाही तर तो गुन्हा आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### एखाद्याला जांभई आली की दुसऱ्यालाही का येते?

जांभई आली की आपण लगेच तोंडासमोर हात धरतो. पण गंमत अशी की बाजूला बसलेल्या मित्राने जांभई दिली की आपल्यालाही लगेच जांभई येते. वर्गात एकाने जांभई दिली की हळूहळू सगळा वर्ग जांभया द्यायला लागतो. याला शास्त्रज्ञ 'संसर्गजन्य जांभई' असं म्हणतात. ही फक्त सवय नाही, तर यामागे मेंदूचे विज्ञान दडलेले आहे. सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे 'मिरर न्यूरॉन'. आपल्या मेंदूत काही विशेष पेशी असतात. त्या समोरच्या व्यक्तीची कृती बघून त्याचप्रमाणे ॲक्टिव्ह होतात. जसं समोरचा माणूस हसला की आपणही हसतो, तो रडला की आपल्यालाही वाईट वाटते. अगदी तसेच, तो जांभई देतो तेव्हा आपल्या मेंदूतील मिरर न्यूरॉन जागे होतात. मेंदूला वाटते की आपणही तीच कृती करतोय आणि मग आपले तोंडही आपोआप मोठे उघडले जाते. म्हणूनच टीव्हीवर किंवा फोटोतसुद्धा जांभई बघितली तरी आपल्याला जांभई येते. दुसरे कारण आहे सहानुभूती. जांभईचा संसर्ग सगळ्यांना सारखा होत नाही.

संशोधन असे सांगते की, आपले आई-वडील, जिवलग मित्र, भावंडे यांची जांभई आपल्याला लवकर लागते. अनोळखी माणसाच्या तुलनेत जवळच्या माणसाची जांभई ६ पट जास्त संसर्गजन्य असते. लहान मुलांना ४ वर्षांपर्यंत हा संसर्ग होत नाही, कारण तोपर्यंत त्यांच्यात सहानुभूतीची भावना पूर्ण विकसित झालेली नसते. माणसांप्रमाणेच चिंपांझी, कुत्रे यांनाही मालकाची जांभई बघून जांभई येते. यावरून कळते की जांभई हा सामाजिक बंध घट्ट करणारा प्रकार आहे. तिसरा सिद्धांत 'मेंदू थंड ठेवण्याचा' आहे. शास्त्रज्ञांच्या मते जांभई देताना आपण मोठा श्वास घेतो आणि तोंड उघडतो. त्यामुळे थंड हवा मेंदूपर्यंत पोहोचते व मेंदूचा रक्तपुरवठा वाढतो. याने मेंदूचे तापमान १-२ अंशाने कमी होते आणि तो जास्त 'अलर्ट' होतो.

कंटाळा आल्यावर किंवा झोप येत असताना मेंदू गरम होतो. तेव्हा एकाने जांभई दिली की गटातील इतरांचे मेंदूही 'आपल्यालाही सावध व्हायला हवे' असा सिग्नल देतात. म्हणून एकामागून एक सगळ्यांना जांभया येतात. थोडक्यात, जांभई येणे हा आजार नाही. हा आपल्या उत्क्रांतीचा एक भाग आहे. गटाने एकत्र राहण्यासाठी, एकमेकांच्या भावना समजण्यासाठी निसर्गाने केलेली ही योजना आहे. त्यामुळे पुढच्या वेळी वर्गात मित्राला जांभई आली आणि तुम्हालाही आली, तर समजून जा की तुमचा मेंदू आणि तुमचं मन दोन्ही व्यवस्थित काम करत आहेत.

फक्त ४५% लोकांना दुसऱ्याची जांभई बघून जांभई येते. जर तुम्हाला येत नसेल, तर तुम्ही कमी सहानुभूती असलेले आहात असे नाही. प्रत्येकाचा मेंदू वेगळ्या पद्धतीने काम करतो.

### खरी एकता

वडगाव नावाच्या गावात रहीम चाचा राहायचे. गावाच्या वेशीवर त्यांची छोटीशी चहाची टपरी होती. सकाळी ५ वाजता टपरी उघडली की पहिला चहा पांडुरंग काका प्यायचे. पांडुरंग काका गावातल्या विठ्ठल मंदिराचे पुजारी. त्यानंतर फादर पीटर चर्चम धून येऊन चहा घ्यायचे. तिघांचे रोजचे हे वेळापत्रक ठरलेले होते. रहीम चाचा सगळ्यांना 'माझी माणसं' म्हणायचे. ईदला शिरखुर्मा, दिवाळीला करंज्या आणि नाताळला केक, हे तिघे एकमेकांच्या घरी आवर्जून घेऊन जायचे.

एक वर्षी गावात मोठा दुष्काळ पडला. पाऊस नसल्याने विहिरी आटल्या. पाण्यासाठी गावकरी ३-३ किलोमीटर पायपीट करू लागले. गावातलं एकमेव जुनं बारव तेवढं शिल्लक होतं. पण त्याचं पाणी गढूळ झालं होतं. प्यायला योग्य नव्हतं. सरपंचाने मीटिंग बोलावली. पण 'बारव कुणाची' यावरून वाद सुरू झाला. काही जण म्हणाले, 'हे मंदिराच्या जागेत आहे'. दुसरे म्हणाले, 'नाही, मशिदीच्या वक्फ बोर्डाची जमीन आहे'. तिसरे म्हणाले, 'चर्चच्या शाळेजवळ आहे म्हणजे आमचं'. वाद विकोपाला गेला. तीन दिवस गावात तणाव होता. रहीम चाचाची टपरीही बंद पडली. चौथ्या दिवशी पहाटे रहीम चाचा, पांडुरंग काका आणि फादर पीटर तिघे कुदळ-फावडे घेऊन बारवावर आले. गावकऱ्यांना वाटलं आता भांडण होणार. पण तिघांनी डोक्याला पांढरे फडके बांधले आणि बारवात उतरले. दिवसभर तिघांनी मिळून गाळ काढला, शेवाळ साफ केलं, बाजूने दगडी भिंत रचली. संध्याकाळपर्यंत बारवाचे पाणी नितळ झाले. तिघे दमून वर आले तेव्हा सगळा गाव गोळा झाला होता.

रहीम चाचा म्हणाले, 'तहान लागल्यावर पाणी जात, धर्म, देव विचारत नाही. ते फक्त जीव वाचवतं'. पांडुरंग काकांनी बारवाच्या कठड्यावर तुळशीचे रोप लावले. फादर पीटर यांनी बाजूला क्रॉस रोवला आणि रहीम चाचाने हिरवी चादर चढवली. तिघे म्हणाले,

'आजपासून ही बारव 'एकता बारव' आहे. इथे प्रत्येकाला पाणी मिळेल'. दुसऱ्या दिवशी चमत्कार झाला. मंदिराचा घंटानाद, मशिदीची अजान आणि चर्चची प्रार्थना एकाच वेळी सुरू झाली. तिन्ही आवाज बारवाच्या पाण्यात मिसळले. गावकरी रांगेत उभे राहून पाणी भरू लागले. कुणीही 'तू आधी, मी आधी' केले नाही. रहीम चाचाने पुन्हा टपरी उघडली. आता चहा सोबत तो 'एकतेचे पाणी' पण फुकट देऊ लागला. त्या वर्षी पाऊस उशिरा पण जोरात पडला. पण गावकऱ्यांच्या मनातला दुष्काळ मात्र 'एकता बारव' ने कायमचा संपवला. आता वडगावात लग्न असो वा सण, स्वयंपाकाची पहिली पंगत 'एकता बारव'जवळच बसते. कारण गावकऱ्यांना कळलं होतं की वेगवेगळ्या वाटा असल्या तरी तहान एकच असते आणि ती भागवणारे पाणीही एकच असते.

बोध : सर्व धर्मांचा आदर म्हणजेच खरी एकता.

## आत्मशक्ति



शिकवलेले पाच नामजीवन मृत्युच्या कालचक्रातून मुक्त करु शकतात आणि आत्मा, परमात्मा ह्यांचा संयोग घडवू शकतात. सूफी लोक आत्मा अमर आहे असे मानतात आणि प्रभुच्या नामाचा जप अथवा सुमिरन त्यांच्या आत्म्याला मुक्त करून. परमेश्वराशी एकरूप करतो अशी त्यांची धारणा आहे. मौलाना रूमीसाहेब आंतरीक यात्रेबाबत म्हणतात,

मी एक धातु बनलो व नंतर मृत्यु पावलो, नंतर एक रोपटे (वनस्पती बनलो) त्या रोपट्याच्या

### देवदूत

मृत्युनंतर जनावर बनलो. जनावर म्हणून नष्ट झाल्यावर मी आतां मनुष्य बनलो आहे. मग मी मृत्युला का भ्यावे ? मृत्यु पावतांना माझ्यात काय कमीपणा आला? आणि पुनः एकदा मी मरेन, आणि देवदूत म्हणून जन्माला येईन. परंतु, देवदूतांच्याही पुढे मला जन्म घ्यावा लागेल!

परमेश्वराशिवाय बाकी सारे नष्ट होईल. जेव्हां मी माझ्या आत्म्याचे बलिदान करीन व मग असा काही बनेल ज्याचा कोणी विचारही करू शकणार नाही ! अहाहा ! अहो, मला निर्जीव होण्यासाठी जीवंत ठेवू नका! मी घोषणा करतो की, मी परमेश्वरापर्यंत पुन्हा परत जाईल.गएखादा मनुष्य मृत्युपंथाला लागतो, तेव्हा ह्या ग्रंथाचे वाचन केले जाते. त्यामुळे मरणाऱ्या माणसाच्या आत्म्याला पुढील प्रवासाची दिशा स्पष्ट होते. मृतकाचा आत्मा काही काळांपुरता पृथ्वीलगतच्या 'इरीवे' ह्या मंडळात राहतो. तेथे आत्म्याला वेगवेगळ्या प्रकारची दृश्ये दिसतात. ही दृश्ये आनंददायी किंवा भयावह असतात. ग्रंथ वाचणारा वाचक मरणाऱ्या माणसाच्या आत्म्याला सांगतो की,

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

सुरेश ओबेरॉय भलेही आपण अनेकदा इतरांना काही दिलं तरी त्यामागची प्रेरणा ही सुकर्माचा संचय करण्याची किंवा त्या बदल्यात स्वर्गात जागा मिळवण्याची असते.

शिवानीदीदी :

अध्यात्म आपल्याला शिकवतं की औदार्य हाच आत्म्याचा मूळ स्वभाव आहे. जेवढं जास्त द्याल तेवढे मानसिक आणि आध्यात्मिक पातळीवर शक्तिशाली बनाल. हाच अध्यात्मिक नियम आहे, पण तुम्ही प्रयत्न नक्कीच करायला हवा.

आपण जेव्हा घेण्याच्या स्थितीत असतो, तेव्हा आपल्या मध्ये स्पर्धेचे भाव निर्माण होतात. इतरांवर नियंत्रण ठेवण्याची आणि त्यांचे पाय ओढण्याची इच्छा निर्माण होते. यामुळे आत्म्यावर भीतीचा संस्कार निर्माण होतो.

सुरेश ओबेरॉय :

### स्वार्थीपणा

भीतीचा आणि तिरस्काराचा. शिवानीदीदी स्वार्थीपणाचासुद्धा. भीती आणि स्वार्थीपणा आत्म्याचे संस्कार बनले आणि आपण कमकुवत झालो. जेव्हा आपण विचार करतो की, 'मला हे हवं आहे' तेव्हा ह्या विचाराच्या बरोबरीने 'हे मला मिळालं नाही तर?' अशी भीतीही निर्माण होते.

सुरेश ओबेरॉय आणि ते माझ्या हातून निसटलं तर?

शिवानीदीदी : आणि जर दुसऱ्या कोणाला मिळालं तर ?

सुरेश ओबेरॉय आणि जर इतर कोणी माझ्याकडून ते हिरावून घेतलं तर?

शिवानीदीदी :

आपण म्हणतो की जे सर्वांत उपयुक्त असेल तेच टिकेल, पण हा विश्वास खरं तर आत्म्याला कमकुवत बनवतो.

चला आता बघू या, आपण जर जिवंत राहण्याच्या स्थितीतून सेवा करण्याच्या स्थितीत गेलो तर काय होईल? जर आपल्याकडे देण्याचा, वाटण्याचा संस्कार आहे तर आपण कोणाबरोबरही स्पर्धा किंवा त्यांची नक्कल करणार नाही. आपण आपल्याच प्रवासात असू. इतरांशी स्पर्धा न करता किंवा कोणाचीही नक्कल न करता आपल्या क्षमतांप्रमाणे शक्य ते आपण मिळवू. गोष्टी विभागून घेण्याचा आणि सेवा करण्याचा संस्कार आपल्यात विकसित होईल. त्यामुळे भीती आणि स्वार्थीपण दूर जाईल. अशा परिस्थितीत आपल्या आत्म्याचं सामर्थ्य वाढेल की कमी होईल?

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

पेशंट : डॉक्टर, ऑपरेशननंतर मी तबला वाजवू शकेन का?
डॉक्टर : हो, नक्कीच वाजवू शकाल.
पेशंट : कमाल आहे! मला तर आधी तबला येतच नव्हता.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक कोठे झाला?

– रायगड किल्ल्यावर

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

६) चेहऱ्यावर काळे वांग आले असतील, तसेच चेहऱ्यावर सुरकुत्या पडल्या असतील, तर बटाट्याची पेस्ट व लोणी एकत्र करून चेहऱ्याला हलक्या हाताने १०-१५ मिनिटे चोळावे. यामुळे त्वचेवरील सुरकुत्या कमी होऊन त्वचा कांतियुक्त होते.

७) केस रूक्ष व कोरडे होऊन केसांचा रूक्षपणा वाढला असेल, तर तो कमी करण्यासाठी बटाटे उकडलेले पाणी फेकून न देता अंघोळीच्या वेळी केसांवरून घ्यावे. बटाट्याच्या सालीलगत क जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असते. त्यासोबत प्रथिनेही विपुल प्रमाणात असल्याने केसांचा रूक्षपणा कमी होऊन केस मृदू-मुलायम व लांब होतात.

### बटाट्याचे उपाय

८) त्वचेवर एखादी जुनी जखम असेल, तर ती जखम भरून येण्यासाठी कच्च्या बटाट्याची पेस्ट जखमेवर लावून वरून सुती कापड बांधावे. यामध्ये असणाऱ्या क जीवनसत्त्वामुळे व अल्कलीमुळे जखमेतील जंतू नाहीसे होऊन जखम भरून येते. त्याचसोबत व त्यामधील आम्लामुळे त्वचेच्या निर्जीव पेशी निघून जाऊन जखम स्वच्छ होते व तेथील त्वचा कांतियुक्त होते.

९) सांधेदुखीचा त्रास जाणवत असेल, तर बटाट्याचा काढा करून तो तीळतेलात उकळावा व याने सिद्ध झालेले तेल सांध्याच्या जागी लावावे. त्यामुळे सांध्याची सूज व सांधेदुखी कमी होते.

१०) चेहऱ्याचा गोरेपणा वाढवायचा असेल, तर बटाट्याची पेस्ट (लगदा) हलक्या हाताने चेहऱ्याला लावावी. त्यामध्ये असणाऱ्या नैसर्गिक सोडा, पोटॅशिअम व अल्कलीमुळे बटाटा नैसर्गिक ब्लीचिंगचे काम करतो. त्यामुळे आपोआप चेहऱ्याचा गोरेपणा वाढतो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००




आयुर्वेदिक रिसेलर्स असोसिएशन महाराष्ट्र राज्य आयोजित विशेष सर्वसाधारण सभा अध्यक्ष शेखर खोले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. (छाया – लहू दळवी)

# आयुर्वेदामुळे नागरिकांचे आरोग्य सुदृढ व निरोगी

### अध्यक्ष शेखर खोले यांचे प्रतिपादन; आयुर्वेदिक रिसेलर्स असोसिएशन महाराष्ट्र राज्याची विशेष सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

नगर – हजारो वर्षांची समृद्ध परंपरा लाभलेले आयुर्वेद शास्त्र हे सुरक्षित, परिणामकारक आणि दुष्परिणाममुक्त आरोग्यपद्धती आहे. आयुर्वेदाच्या माध्यमातून अनेक आजारांपासून संरक्षण मिळू शकते आणि प्रत्येक व्यक्ती सुदृढ, निरोगी व आनंदी आयुष्य जगू शकते. त्यामुळे आयुर्वेदाचा अधिकाधिक अंगीकार करून त्याचा समाजात व्यापक प्रसार आणि प्रचार करण्याचा तसेच नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय विशेष सर्वसाधारण सभेत एकमताने घेण्यात आला. आयुर्वेद ही केवळ उपचार पद्धती नसून जीवन जगण्याची योग्य शैली आहे. आयुर्वेदामुळे शारीरिक व मानसिक व्याधींपासून दूर राहून उत्तम आरोग्य प्राप्त करता येते, असे प्रतिपादन आयुर्वेदिक रिसेलर्स असोसिएशन महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष शेखर खोले यांनी केले.

आयुर्वेदिक रिसेलर्स असोसिएशन महाराष्ट्र राज्य आयोजित विशेष सर्वसाधारण सभा अध्यक्ष शेखर खोले यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

यावेळी सेक्रेटरी चंद्रकांत भुसारी, उपाध्यक्ष अभिजीत दुबल, अरुण चौधरी, खजिनदार मुरलीधर कातोरे, सहसचिव स्वप्निल शहा, आशिष ठाकूर, विश्वस्त सुधाकर बोरुडे, अनिल गांधी यांच्यासह राज्यभरातील सभासद उपस्थित होते.

सभेदरम्यान औषध व सौंदर्यप्रसाधने अधिनियम १९४० आणि नियम १९४५ या महत्त्वपूर्ण विषयावर औषध प्रशासन सहाय्यक आयुक्त जावेद शेख, औषध निरीक्षक मुळे तसेच लॉ कॉलेजचे प्राचार्य एम. एम. तांबे यांनी उपस्थित सभासदांना सविस्तर कायदेविषयक मार्गदर्शन केले. त्यांनी औषध व्यवसायातील नियम, कायदेशीर जबाबदाऱ्या आणि बदलत्या तरतुदींबाबत माहिती देत शंकांचे निरसन केले.

यावेळी विश्वस्त सुधाकर बोरुडे म्हणाले की, असोसिएशनच्या नियमावलीत आवश्यक बदल करणे, राज्यभर आयुर्वेदाचा व्यापक प्रसार–प्रचार करणे, आयुर्वेदाबाबत जनजागृती वाढविणे यांसह विविध महत्त्वाचे विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आले. ते पुढे म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत आधुनिक उपचारपद्धतींच्या काही दुष्परिणामांना सामोरे जावे लागते; मात्र आयुर्वेद ही नैसर्गिक, सुरक्षित आणि दुष्परिणाममुक्त आरोग्यपद्धती आहे. आयुर्वेदामुळे जीवनशैलीमध्ये सकारात्मक बदल घडतो, ताणतणाव कमी होतो आणि निरोगी, आनंदी जीवन जगण्यास मदत मिळते. समाजामध्ये आयुर्वेदाचा प्रचार–प्रसार होणे ही काळाची गरज असून ग्राहकांपर्यंत आयुर्वेद शास्त्र पोहोचविण्याची महत्त्वाची जबाबदारी सभासदांवर आहे. आयुर्वेद हे प्राचीन आणि शास्त्रीय ज्ञान असून ते आधुनिक काळाशी सुसंगत पद्धतीने पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. असोसिएशनच्या माध्यमातून राज्यस्तरीय आयुर्वेद महोत्सव दरवर्षी उत्साहात आयोजित केला जात असून सभासदांना केंद्रस्थानी ठेवून संघटना अधिक सक्षम करण्याचे काम सातत्याने सुरू आहे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी सचिव चंद्रकांत भुसारी यांनी संघटनेचा आर्थिक अहवाल व विविध उपक्रमांची माहिती सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल गांधी यांनी केले. खजिनदार मुरलीधर कातोरे यांनी आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## तोचि खरा हरिदास

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स




दुसऱ्याला सांगायची नीती अनीतीची दाखवायची भीती. स्वतःची मात्र अनीतीवरच प्रीती. पण ती दिसू नये म्हणून करायच्या हिकमती. म्हणतो, मी जाणतो फक्त करणे काम. कधी घेत नाही त्याचे दाम. माझी सेवा सदैव निष्काम. पण या म्हणण्यात काय राम? असा माणूस केवळ हराम ! अरे माणसा, पण अर्थ आणि काम, यांना उगाच का करायचे बदनाम ? त्यांचे तर पुरुषार्थ असे उपनाम. व्यास ऋषी महाभारतात काय सांगतात ते तर पाहा, उर्ध्वबाहुर्वैरोम्येष। नच कश्चित्शुणोति मे। धर्मादर्थश्च कामश्च स किमर्थ न सेव्यते ।।

अरे, इकडे लक्ष द्या रे. पण सगळेच काय झालात बहिरे ? अरे धन हवेच. काम नसेल तर जग खुंटलेच. तेव्हा धनाला मी नाही कुठे म्हणतो? काम नसावा असे का सांगतो? उलट धर्म तुम्हाला सगळ्यांना भावतो. तो धर्म, धन आणि काम यांच्या पूर्ततेचे साधन असते. धनपूर्ती आणि कामतृप्ती यासाठीच धर्माची निर्मिती. धनासाठी धावणे. फक्त आपल्या या धडपडीने इतरांना मात्र उपद्रव न देणे. इतरांचे अहित न करणे. इतरांना जीवनातून न उठवणे. माणुसकीला सदा जागणे. बस, यालाच धर्म म्हणणे. हाच धर्म पाळा, हे सत्य सांगणे. संत तुकोबारायांचे तरी काय वेगळे म्हणणे ? 'ज्यासी माती परनारी त्याचे मुखी खरा हरी ज्याला परधन विष तोचि खरा हरिदास'

नुसते देवाचे नाव देऊन का नीतीचे पुतळे होणार तुम्ही ?

कामभावना आवरा, मातेसमान माना परदारा. धनाचेही असेच समजेना. धन हवे. पण दुसऱ्याला लुबाडून का ते मिळवावे नाही स्वतःच्या श्रमाने गरजांना भागवावे म्हणून धन कमवावे. हीच खरी नीतिमत्ता ही खरी ईश्वरसेवा.

धन हवे. कामही भागवणे अवश्य व्हावे, असे संताचेही सांगणे, पण यात नीती सांभाळणे मोलाचे.

एकदा एक नीतीवर व्याख्यान देणारे वयस्कर गृहस्थ चित्रपटाला गेले. चित्रपट सुरू झाला. एक सुंदर उद्यान त्यात मोठा पोहण्याचा तलाव. पण हे रेल्वेलाईनच्या पलीकडे. मध्येच गाडी जाई. दृश्यांची रंगत वाढत राही. एका दृश्यात काही तरुणी पडद्यावर दिसल्या. त्या सुंदर व मोहक युवती त्या तलावात पोहायला निघाल्या. रेल्वेलाईन ओलांडून पलीकडे तलावाकाठी पोहोचल्या. आता त्या तलावात उतरणार होत्या. हे नीतिमान गृहस्थ ते पाहून मोहोरले. पुढच्या दृश्यांची मनातल्या मनात कल्पना करू लागले. पण तेवढ्यात रुळावरुन आगगाडी धडधडत गेल्याने पुढले दृश्य दिसले नाही. आगगाडीने ऐनवेळी घात केला, गृहस्थ पुटपुटले.

मग त्या चित्रपटाच्या प्रत्येक खेळाला ते जायला लागले. दोन तीन दिवस प्रत्येक शो ला हजर राहणाऱ्या त्यांना दारावरील तिकिट पाहणाऱ्याने ओळखले व उत्सुकतेपायी विचारले, आपण परवापासून रोज प्रत्येक खेळाला असता आणि आगगाडी गेली की चित्रपट सोडून तणतणत निघून जाता. का?

ते म्हणाले, अरे, मी रोज प्रत्येक खेळाला येतो आणि अपेक्षा करतो की, या खेळाच्या वेळी तरी आगगाडी लेट होईल किंवा अलीकडच्या स्थानकावर ती रुळावरून घसरेल, पण छे! एवढी वक्तशीर रेल्वे मी पाहिली नाही. जे पिटतात नीतीचे ढोल। त्यांचा असाच सुटतो तोल।।

– किशोर गांधी



**दिल्ली भाजपचे प्रदेशाध्यक्ष हर्ष मल्होत्रा यांना ध्यानधारणेची पुस्तके भेट**

लेह लडाख केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय तसेच कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय राज्यमंत्री व दिल्ली प्रदेश भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्ष मल्होत्रा हे लेह लडाख येथील महाबोधी इंटरनॅशनल मेडिटेशन सेंटर येथे आयोजित योग महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात आले असता अहिल्यानगर येथील सोनई सेवाकेंद्राच्या प्रमुख बी के उषा दीदी यांनी त्यांची भेट घेऊन प्रेरणादायी वक्त्या बीके शिवानी यांचे असीम आनंद की ओर हे पुस्तक भेट दिले. यावेळी बीके डॉ. दीपक हरके, मिस इंडिया डॉ. इशा अगरवाल उपस्थित होते.

# नगर बाजार समितीचे सचिव अभय भिसे यांची राज्यस्तरीय समितीच्या सदस्यपदी निवड

नगर – कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये बाजार शुल्क न भरणाऱ्या व्यवसायधारकांकडून होणाऱ्या व्यवहारावर १ टक्का प्रमाणे युजर चार्जेस आकारणी करण्याच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या निर्देशानुसार राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर युजर चार्जेस आकारणी करणे कायद्यानुसार अपेक्षित असून बाजार समित्यांच्या उपविधीनुसार बंधनकारक आहे. मात्र, अद्यापपर्यंत अहिल्यानगरसह राज्यातील अनेक बाजार समित्यांकडून या शुल्काची आकारणी करण्यात आलेली नव्हती.

या पार्श्वभूमीवर पणन मंत्री यांच्या आदेशानुसार पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी याबाबत राज्यस्तरीय समिती गठीत केली आहे. या समितीमध्ये अहिल्यानगर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव अभय बाबासाहेब भिसे यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

सदर समितीची पहिली राज्यस्तरीय बैठक ३० जून रोजी पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे पार पडली. बैठकीमध्ये युजर चार्जेस आकारणीबाबत विविध मुद्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी समितीतील सर्व सदस्यांना सदर विषयाचा अभ्यास करून कायदेशीर बाबी, बाजार समित्यांची कार्यपद्धती, व्यापारी व शेतकरी हिताचा विचार करून अभ्यासपूर्ण लेखी अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. समितीच्या अहवालानंतर राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये युजर चार्जेस आकारणीबाबत पुढील कार्यवाही होण्याची शक्यता आहे. नगर बाजार समितीचे सचिव श्री. अभय भिसे यांची राज्यस्तरीय समितीवर निवड झाल्याने बाजार समितीच्या कामकाजातील अनुभवाचा राज्यस्तरावर उपयोग होणार आहे.



बाजार समित्यांमधील युजर चार्जेस आकारणीबाबत राज्यस्तरीय समितीत सदस्यपदी नगर बाजार समितीचे सचिव अभय भिसे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना पदाधिकारी.

# रात्रशाळेतील जिद्दी विद्यार्थ्यांना यशवंती मराठा महिला मंडळाचा ज्ञानाचा आधार

### भाई सथ्था नाईट हायस्कूलमधील अकरावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना पुस्तक संचांचे वाटप; यशवंती मराठा महिला मंडळाने राबविलेला उपक्रम स्वर्गीय प्रा. शिरीष मोडक यांना खरी श्रध्दांजली : डॉ. पारस कोठारी

नगर – आर्थिक, सामाजिक तसेच कौटुंबिक अडचणींवर मात करत दिवसा काम करून उदरनिर्वाह आणि रात्री शिक्षण घेण्याचा संघर्ष करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला बळ देण्यासाठी यशवंती मराठा महिला मंडळाने पुढाकार घेतला. हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमधील अकरावी व बारावीच्या कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना पुस्तक संचांचे वाटप करून त्यांच्या शिक्षणाला मदत करण्यात आली.

रात्रशाळेत आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे विद्यमान चेअरमन डॉ. पारस कोठारी होते. यावेळी नगरसेविका गीतांजली काळे, यशवंती मराठा महिला मंडळाच्या शहराध्यक्ष मीराताई बारस्कर, संस्थापक अध्यक्षा मायाताई कोल्हे, प्राचार्य सुनील सुसरे, माजी मुख्याध्यापिका निर्मला भंडारी तसेच महिला मंडळाच्या मीराताई बेरड, संगीताताई दरेकर, अपर्णा शेलार, कल्पनाताई भंडारी, वैष्णवीताई बारस्कर, वर्षा लगड, मंगलाताई देशमुख, अनिता मोरे, मंगलताई शिरसाठ, लताताई भापकर, वैशाली थोरात, राजश्री शेळके, आशाताई शिंदे, विद्याताई काळे, मेधाताई झावरे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमधील अकरावी व बारावीच्या कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना पुस्तक संचांचे वाटप करून त्यांच्या शिक्षणाला मदत करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष स्वर्गीय प्रा. शिरीष मोडक यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या समर्पित कार्याचा यावेळी उपस्थितांनी भावपूर्ण शब्दांत गौरव केला.

प्रास्ताविकात प्राचार्य सुनील सुसरे यांनी रात्रशाळेतील विद्यार्थ्यांचा संघर्ष अधोरेखित करत सांगितले की, अनेक विद्यार्थी दिवसभर नोकरी, व्यवसाय अथवा मजुरी करून रात्री शिक्षणासाठी वर्गात येतात. प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षण पूर्ण करण्याची त्यांची जिद्द प्रेरणादायी आहे. अशा विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी यशवंती मराठा महिला मंडळाने पुढाकार घेतला असून, हा उपक्रम समाजासाठी आदर्शवत आहे. समाजातील विविध संस्था अशा विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभ्या राहिल्या तर अनेकांचे भविष्य उज्वल होऊ शकते, असे त्यांनी नमूद केले.

नगरसेविका गीतांजली काळे म्हणाल्या की, यशवंती मराठा महिला मंडळाच्या माध्यमातून दरवर्षी गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येते. यंदा रात्रशाळेतील विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन पुस्तक संच उपलब्ध करून देण्यात आले आहेत. आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये, हा मंडळाचा कायमचा प्रयत्न आहे. शिक्षण हीच खरी समाजपरिवर्तनाची गुरुकिल्ली असून, प्रत्येक सक्षम नागरिकाने आपल्या परीने शिक्षणासाठी योगदान दिले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

यशवंती मराठा महिला मंडळाच्या शहराध्यक्ष मीराताई बारस्कर म्हणाल्या की, रात्रशाळेतील विद्यार्थ्यांचा संघर्ष पाहिल्यानंतर त्यांना मदत करण्याचा निर्णय महिला मंडळाने घेतला. दिवसा कष्ट आणि रात्री अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वप्न पूर्ण व्हावे, यासाठी हा छोटासा प्रयत्न आहे. भविष्यातही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा ओळखून अशाच प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविले जातील. समाजातील प्रत्येक घटकाने शिक्षणासाठी हातभार लावला तर अनेक कुटुंबांचे भविष्य बदलू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

संस्थापक अध्यक्षा मायाताई कोल्हे म्हणाल्या की, शिक्षणामुळेच व्यक्तीचे जीवन बदलते आणि समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करतो. आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण अर्धवट सोडावे लागलेल्या विद्यार्थ्यांनी पुन्हा शिक्षणाची वाट धरली, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. अशा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे हे समाजाचे कर्तव्य असून, त्यांच्या यशात समाजाचाही वाटा असावा, या भावनेतून पुस्तक संच वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी या संधीचे सोने करून उच्च शिक्षण घेऊन समाजात आदर्श निर्माण करावा, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. पारस कोठारी म्हणाले की, हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष स्वर्गीय प्रा. शिरीष मोडक यांनी आयुष्यभर गरजू, होतकरू आणि वंचित विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सातत्याने कार्य केले. शिक्षणासाठी आर्थिक मदत, शैक्षणिक साहित्य तसेच प्रोत्साहन देण्याची त्यांची परंपरा होती. यशवंती मराठा महिला मंडळाने राबविलेला हा उपक्रम म्हणजे त्यांच्या कार्याला आणि विचारांना वाहिलेली खरी श्रद्धांजली आहे. रात्रशाळा ही केवळ शिक्षणाची संस्था नसून नव्याने आयुष्य घडविण्याचे व्यासपीठ आहे. येथे शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने आत्मविश्वास, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर यश संपादन करून समाजासमोर आदर्श निर्माण करावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी विद्यार्थ्यांना अकरावी व बारावीच्या कला व वाणिज्य शाखेचे पुस्तक संच वितरित करण्यात आले. सूत्रसंचालन वृषाली साताळकर यांनी केले. स्वाती होले यांनी आभार मानले. या उपक्रमाचे संस्थेचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, मानद सचिव संजय जोशी, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा, अजित बोरा व सर्व कार्यकारिणी सदस्य, शालेय समिती सदस्यांनी अभिनंदन केले.



दिल्ली गेट येथील शनी मारुती मंदिरात भाविकांसाठी 'ज्ञानशक्ती वाचनालया'चा उद्घाटन सोहळा झाला.

# शनी मारुती मंदिरात 'ज्ञानशक्ती वाचनालया'चे उद्घाटन

नगर – दिल्ली गेट येथील शनी मारुती मंदिरात भाविकांसाठी ३० जून रोजी 'ज्ञानशक्ती वाचनालया'चा उद्घाटन सोहळा झाला. मंदिर महासंघाच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना अध्यात्म आणि धर्मशिक्षणाची गोडी लागावी, या उद्देशाने हे वाचनालय सुरू करण्यात आले आहे.

या वाचनालयाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे येथे येणाऱ्या भाविकांसाठी विविध धार्मिक, आध्यात्मिक आणि धर्मशिक्षण देणारे अनेक दुर्मिळ व मार्गदर्शक ग्रंथ विनामूल्य वाचनासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यामुळे केवळ दर्शनच नव्हे, तर मंदिराच्या पवित्र वातावरणात येणाऱ्या पिढीला संस्कार आणि ज्ञानाची शिदोरी मिळणार असल्याचे संयोजकांनी सांगितले.

या प्रसंगी हिंदू संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यामध्ये शनि मारुती मंदिराचे अध्यक्ष मच्छिंद्र डवरे, सचिव लक्ष्मण इगे, सहसचिव अतुल पिंपरकर, मंदिराचे पुजारी अमोल नागापुरे, जिल्हा हिंदू संघटक बापू ठाणगे, हिंदू जनजागृती समितीचे रामेश्वर भुकन, ॲड. श्रीराम भारदे, ह.भ.प. प्रभाताई भोंग, सुनील शिंदे, मच्छिंद्रनाथ देवस्थानचे सचिव बाबासाहेब मस्के, बाबासाहेब चौधरी, संजय जोशी आणि चैतन्य शेकडे यांचा समावेश होता.

भाविकांनी या ज्ञानशक्ती वाचनालयाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आक्रमक अकरा मराठा युनिटचे देशसेवेच्या कार्यात मोठे योगदान

**डॉ.सोमेश्वर गायकवाड यांचे प्रतिपादन**

नगर – आक्रमक अकरा मराठा इन्फट्रिचा ४८ वा रेझिंग डे अहिल्यानगरमध्ये उत्साहाने साजरा करण्यात आला आहे. देशसेवेच्या कार्यात आक्रमक अकरा युनिटचे मोठे योगदान आहे. स्नेह मेळाव्याच्या माध्यमातून सर्व माजी सैनिक व परिवार एकत्रित आल्याचा आनंद होत आहे. निवृत्तीनंतर सर्वांनी आपल्या आरोग्याची नियमितपणे काळजी घ्यावी. प्रत्येक वर्षी प्राथमिक आरोग्य तपासणी करणे आवश्यक आहे. सेवानिवृत्ती नंतरही एकजूट राहिले तर माजी सैनिकांचे प्रश्न सुटतील. देशसेवा सोबतच सामाजिक कार्यातही माजी सैनिक आघाडीवर आहेत, असे प्रतिपादन कर्नल डॉ.सोमेश्वर गायकवाड यांनी केले आहे.



आक्रमक अकरा मराठा इन्फट्रिचा रेझिंग डे अहिल्यानगरमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला.

छत्रपती संभाजीनगर रोड येथील हॉटेल आकाश येथे आक्रमक अकरा मराठा इंफट्रीचा ४८ वा रेझिंग डे साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी माजी सैनिक सहपरिवार उपस्थित होते. या कार्यक्रमाला स्नेह मेळाव्याचे स्वरूप प्राप्त झाले होते. तसेच यावेळी

**इन्फट्रिचा ४८ वा रेझिंग डे उत्साहात साजरा**

देशभक्ती पर गीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत कर्नल डॉ.सोमेश्वर गायकवाड यांच्यासह सुभेदार दत्तात्रय येणारे, सुभेदार महादेव कोतकर, कॅप्टन सखाराम शिंदे, सुभेदार मोहन दुसुंगे, सुभेदार मोहन शिंदे, सुभेदार बापू साठे, सुभेदार संदिप ठोकळ, सुभेदार मच्छिंद्र येवले, विलास शेळके, रोहिदास मापारी, कुंडलिक चेमटे, बाबासाहेब निक्रड, वाल्मीक ओहोळ, दिलीप शेळके, विनायक जरे, दादाभाऊ जपकर, मंगेश गलगते, परमेश्वर कासार, संदीप कळमकर, अशोक फुलसौंदर, संदीप शिर्के, अविनाश साठे, रंगनाथ मगर, भीमराव बनसोडे, अमोल ठुबे, रामदास ठुबे, संजय डोईफोडे, ज्ञानेश्वर नवथर, दत्ता धायगुडे, दीपक मुळे, संतोष करपे, राजेंद्र गांजुरे आदींसह माजी सैनिक उपस्थित होते. सुभेदार दत्तात्रय येणारे यांनी स्वागत केले. कर्तव्य पथावर असलेले सुभेदार संदीप ठोकळ व मच्छिंद्र येवले यांचा विशेष सत्कार करण्यात आला. महादेव कोतकर यांनी आभार मानले.

# रक्तदान शिबिराचा उपक्रम समाजाप्रती बांधिलकीचे उत्तम उदाहरण

### पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांचे गौरवोद्गार; रोटरी क्लब मिडटाउन व नोबेल हॉस्पीटलच्या शिबिरास प्रतिसाद



डॉक्टर्स डे निमित्त रोटरी क्लब अहमदनगर मिडटाऊन व एशियन नोबेल हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरास पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांनी सदिच्छा भेट देत शुभेच्छा दिल्या. शेजारी शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी डॉ.बापूसाहेब कांडेकर, डॉ.धनंजय कुलकर्णी, ॲड.हेमंत कराळे,मधुर बागायत, डॉ.ज्योत्सना डौले, डॉ.सोनल बोरुडे, विजय निकम आदी.

नगर – रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, ज्याला रक्ताची गरज भासते त्यालाच त्याचे खरे महत्त्व समजते. रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे यासाठी अशा सामाजिक उपक्रमांचे सातत्याने आयोजन होणे आवश्यक आहे. अहमदनगर रोटरी क्लब मिडटाउन व नोबेल एशियन हॉस्पिटल यांनी आयोजित केलेले रक्तदान शिबिराचा उपक्रम समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचे उत्तम उदाहरण असून, या उपक्रमासाठी घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी काढले.

डॉक्टर्स डे निमित रोटरी क्लब अहमदनगर मिडटाऊन व एशियन नोबेल हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरास सदिच्छा भेट देत पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांनी शुभेच्छा दिल्या. रक्तदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी नोबल हॉस्पिटलचे संचालक डॉ.बापूसाहेब कांडेकर, इंडियन मेडिकल असोसिएशनच्या नगर शाखेचे अध्यक्ष डॉ.धनंजय कुलकर्णी, रोटरी क्लब मिडटाऊनचे अध्यक्ष ॲड. हेमंत कराळे, सेक्रेटरी मधुर बागायत, डॉक्टर्स असोसिएशनचे सेक्रेटरी डॉ.अमित करडे, महिला विभागाच्या अध्यक्षा डॉ.ज्योत्सना डौले, सेक्रेटरी डॉ.सोनल बोरुडे, डॉ.संगीता कांडेकर, प्रोजेक्ट चेअरमन विजय निकम आदींसह क्लबचे सदस्य, हॉस्पिटल मधील डॉक्टर, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

डॉ.बापूसाहेब कांडेकर म्हणाले, नोबेल हॉस्पिटल व रोटरी क्लब मिडटाउन गेल्या १९ वर्षांपासून अविरतपणे डॉक्टर डे निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करत आहोत. रोटरी क्लबच्या नव्या अध्यक्षांचा सामाजिक कार्यकाळासही याच उपक्रमाने सुरुवात होत असते. डॉक्टर, सीए व शेतकरी यांचे समाजासाठी मोठे योगदान आहे. म्हणून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी रक्तदान हा स्तुत्य उपक्रम आहे.

रोटरी क्लबचे अध्यक्ष ॲड.हेमंत कराळे म्हणाले, जगातील दोनशे देशांमध्ये गेल्या १२० वर्षांपासून रोटरी क्लब सामाजिक दायित्वाने योगदान देत आहे. आज पूर्ण जगात रोटरी क्लबच्या नवीन वर्षास सुरुवात होत आहे. रोटरी क्लब मिडटाउन व नोबेल हॉस्पिटलच्या या सामाजिक उपक्रमाला दरवर्षी उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.

यावेळी डॉ. धनंजय कुलकर्णी यांनी उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. रक्तदान शिबिरात रोटरी मिडटाऊन क्लबचे सदस्य, हॉस्पिटलचे डॉक्टर, कर्मचारी व नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत प्रतिसाद दिला. डॉक्टर डे निमित्त रोटरी मिडटाऊन क्लबच्या वतीने सर्व डॉक्टरांचा गुलाबपुष्प व तुळशीचे रोप देवून सन्मान करण्यात आला.

नोबेलचे मुख्याधिकारी विजय निकम यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. रोटरी क्लबचे सेक्रेटरी मधुर बागायत यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला रोटरी क्लबचे भावी प्रांतपाल क्षितिज झावरे, माजी पंतपाल प्रमोद पारिख, माजी अध्यक्ष डॉ. विनोद मोरे, माजी सेक्रेटरी मनीष गोपालकृष्णन, नोबल हॉस्पिटलचे डॉ.राहुल हिरे, डॉ. विश्वजित मोरे, मार्लिन एलिषा, विजय इंगळे, प्रतापसिंग पांडे, रमेश उबाळे, वैशाली कराळे, अभिजीत जाधव, ओमकार कुलकर्णी, वर्षा पांडे, रमेश वाबळे, सुजाता वाबळे, मधुरा झावरे, टीना इंगळे, अभिजीत जाधव, अनुजा जाधव, डॉ.आदिती पानसंबळ, डॉ.सोनल बोरुडे, रोहन खिलारी, तुषार देशमुख, रोहित साळुंके, डॉ. सारिका मोरे, डॉ.कृष्णा बलदवा, अक्षय राऊत, अश्विनी दगडे, अनुराधा आरसुळे, डॉ.नितीश इंगळे, डॉ. प्रकाश गरुड व डॉ. योगेश गरुड आदी उपस्थित होते.

# फिरोदिया शिवाजियन्स पुन्हा ठरला एफसी युनिटी गोल्डन कपचा विजेता

### विजयाची केली हॅट्रिक; सडन डेथमधून सुमन एंटरप्रायझेस एफसीवर ४-३ अशी मात



नगर – भुईकोट किल्ला येथील मैदानावर युनिटी फुटबॉल क्लबच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त आयोजित युनिटी गोल्डन कप फिरोदिया शिवाजियन्स संघाने पटकाविला. ७-अ-साईड फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम सामन्यात फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल क्लब संघाने सुमन एंटरप्रायझेस फुटबॉल क्लब सडन डेथ पेनल्टी शूटआऊटमध्ये ४-३ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.

अटीतटीच्या झालेल्या अंतिम सामन्यात निर्धारित वेळेत दोन्ही संघांना गोल करण्यात अपयश आल्याने सामना ०-० असा बरोबरीत राहिला. त्यानंतर झालेल्या पेनल्टी शूटआऊटमध्येही दोन्ही संघांमध्ये चुरस कायम राहिल्याने निकाल सडन डेथमध्ये गेला. सडन डेथमध्ये फिरोदिया शिवाजियन्सच्या खेळाडूंनी अचूक फटके मारत ४-३ असा विजय मिळवून चषकावर आपले नाव कोरले. या विजेतेपदासह फिरोदिया शिवाजियन्सने सलग तिसऱ्या स्पर्धेचे विजेतेपद पटकावत आपली विजयी घोडदौड कायम राखली.

स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभास भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक मयूर पवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी किशन चौहान, राजेश चौहान, सुशील लोट तसेच युनिटी फुटबॉल क्लबचे सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

स्पर्धेतील वैयक्तिक बक्षीसांमध्ये फिरोदिया शिवाजियन्सचा सार्थक भोसले याला सर्वोत्कृष्ट स्ट्रायकर, सुमन एंटरप्रायझेसचा ओम डोंगरे याला सर्वोत्कृष्ट गोलरक्षक, तर फिरोदिया शिवाजियन्सच्या स्वराज आडेप याला सर्वोत्कृष्ट बचावपटू (बेस्ट डिफेंडर) या सन्मानासह गौरविण्यात आले. उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते विजयी, उपविजयी व उत्कृष्ट खेळाडूंना बक्षिसे देण्यात आली.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी युनिटी फुटबॉल क्लबचे किशन चौहान, राजेश चौहान, सुशील लोट तसेच सर्व पदाधिकारी व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. युनिटी फुटबॉल क्लबच्या वतीने स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन करण्यात आले होते.

# 'कॉम्रेड अल्ट्रा मॅरेथॉन' पूर्ण करणाऱ्या धावपटूंचा गौरव; ८५.७७ किलोमीटर धावण्याचा थरार



इन्फिनिटी सायकलिंग अकॅडमी, बाईक टेक पॉईंट आणि इन्फिनिटी सायकलिंग कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने दक्षिण आफ्रिकेत नुकत्याच पार पडलेल्या कॉम्रेड अल्ट्रा मॅरेथॉन २०२६ स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करून परतलेल्या अहिल्यानगरच्या धावपटूंचा गौरव करण्यात आला.

नगर – इन्फिनिटी सायकलिंग अकॅडमी, बाईक टेक पॉईंट आणि इन्फिनिटी सायकलिंग कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने दक्षिण आफ्रिकेत नुकत्याच पार पडलेल्या जगप्रसिद्ध आणि अत्यंत खडतर समजल्या जाणाऱ्या कॉम्रेड अल्ट्रा मॅरेथॉन २०२६ स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करून परतलेल्या अहिल्यानगरच्या धावपटूंचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. जागतिक स्तरावरील या स्पर्धेत शहराचे नाव आंतरराष्ट्रीय क्रीडा विश्वात उज्वल करणाऱ्या धावपटूंचा सत्कार करण्यात आला. दक्षिण आफ्रिकेतील डरबन ते पीटरमारित्झबर्ग या दोन शहरांदरम्यान पार पडलेल्या ८५.७७ किलोमीटर अंतराच्या कॉम्रेड अल्ट्रा मॅरेथॉनमध्ये अहिल्यानगरचे डॉ. अमित बडवे, जस्मित वधवा, सुनील बनकर, डॉ. संकेत मुंदडा आणि सचिन राणे यांनी यशस्वीरित्या शर्यत पूर्ण करत उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्या या यशाबद्दल विशेष सन्मानित करण्यात आले.

प्रास्ताविकात संभाजी मोहिते यांनी शहरात आरोग्य चळवळ वेगाने रुजत असल्याचे सांगितले. सायकलिंग आणि धावण्याकडे युवक-युवती मोठ्या प्रमाणावर आकर्षित होत असून सकाळच्या व्यायामाची सवय वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. शहरातून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे सायकलपटू घडावेत, या उद्देशाने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. नुकत्याच जागतिक सायकल दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय सायकलिंग स्पर्धेला प्रतिसाद मिळाला होता. त्याच धर्तीवर १५ ऑगस्ट रोजी पुन्हा सायकलिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असून खेळाडूंनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

कॉम्रेड मॅरेथॉन ही जगातील सर्वात जुनी आणि अत्यंत कठीण अल्ट्रा मॅरेथॉन स्पर्धांपैकी एक मानली जाते. पहिल्या महायुद्धात शहीद झालेल्या सैनिकांच्या स्मरणार्थ सुरू करण्यात आलेल्या या स्पर्धेचे यंदाचे ९९ वे वर्ष होते. दरवर्षी जगभरातील हजारो धावपटू या स्पर्धेत सहभागी होतात. यंदा सुमारे २२ हजार स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. भारतातून २५० हून अधिक धावपटूंनी स्पर्धेत भाग घेतला असून त्यामध्ये अहिल्यानगरच्या पाच धावपटूंनी केलेली कामगिरी विशेष उल्लेखनीय ठरली.

या स्पर्धेत डॉ. अमित बडवे यांनी अवघ्या ९ तास ५८ मिनिटांत अंतर पूर्ण करत मानाचे प्लॅटिनम पदक पटकाविले. त्याचबरोबर जस्मित वधवा यांनी १० तास ७ मिनिटे, डॉ. संकेत मुंदडा यांनी १० तास २३ मिनिटे, सुनील बनकर यांनी ११ तास १० मिनिटे, तर सचिन राणे यांनी ११ तास ५३ मिनिटांत ही अत्यंत कठीण स्पर्धा पूर्ण करून नगरच्या क्रीडा इतिहासात आणखी एक मानाचा अध्याय जोडला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी धावपटूंच्या जिद्द, चिकाटी, शिस्त आणि अथक परिश्रमाचे कौतुक केले. अशा प्रकारच्या आंतरराष्ट्रीय यशामुळे शहरातील युवकांना क्रीडा क्षेत्राकडे प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

कॉम्रेड मॅरेथॉन पूर्ण करणारे धावपटू जस्मितसिंह वधवा यांनी सांगितले की, प्रत्येकाने आयुष्यात एखादा छंद जोपासला पाहिजे, त्यामुळे जीवन अधिक आनंदी आणि निरोगी बनते. गेल्या चार-पाच वर्षांपासून सायकलपटू म्हणून कारकीर्द करत असताना कॉम्रेड मॅरेथॉनचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जवळपास वर्षभर कठोर मेहनत घेतली. सलग आठ महिने चाँदबीबी महाल परिसरात नियमित सराव केला. उन्हाळ्यात मध्यरात्री १२ वाजता धावण्यास सुरुवात करून पहाटेपर्यंत रात्रभर सराव केला, अशी मेहनतीची कहाणी त्यांनी सांगितली.

सुनील बनकर यांनी २०१७ मध्ये केवळ १० किलोमीटर धावण्यापासून सुरुवात केल्याचे सांगितले. सातत्यपूर्ण सराव, सहकाऱ्यांचे मार्गदर्शन आणि कुटुंबीयांच्या पाठबळामुळे आज कॉम्रेड मॅरेथॉन पूर्ण करण्याचे स्वप्न साकार झाले. परदेशात भारताचे प्रतिनिधित्व करताना अभिमान वाटल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

सचिन राणे यांनी आयुष्यात पैसा कमावताना अनेकजण शरीररूपी संपत्तीची उपेक्षा करतात. आरोग्य हीच खरी संपत्ती असून त्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे, असा संदेश त्यांनी दिला. मोबाईलमध्ये गुंतलेल्या नव्या पिढीसमोर आरोग्याचे मोठे आव्हान उभे राहत असून खेळ आणि व्यायामाचे महत्त्व भविष्यात अधिक वाढणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी मलेशिया येथे फुल आयर्नमॅन स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण करणारे चेतन नवलानी (१६ तास ४६ मिनिटे) आणि दिनेश संकलेचा (१५ तास २८ मिनिटे) यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. दोघांनीही आंतरराष्ट्रीय स्पर्धांतील अनुभव सांगत सातत्यपूर्ण सराव आणि मानसिक तयारीचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमात खेळाडूंना सातत्याने प्रोत्साहन देणारे गौरव फिरोदिया यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले. या कार्यक्रमास शिवछत्रपती पुरस्कार विजेते गणेश पवार, माजी सायकलिस्ट लाला कांबले, धन्यकुमार हराळ, मुबीन शेख, मयुर गवळी यांच्यासह शहरातील सायकलप्रेमी व रनर्स उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रशेखर मुळे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार मानून वंदे मातरम गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलच्या अध्यक्षपदी अमर गुरप आणि सचिवपदी सुनील मुथा यांची निवड





नगर – रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ अंतर्गत कार्यरत रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलच्या सन २०२६-२७ या वर्षासाठी अध्यक्षपदी रो. अमर गुरप व सचिवपदी रो. सुनील मुथा यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

रोटरी इंटरनॅशनलचे अध्यक्ष रो. ओलायिंका हकीम बाबालोला तसेच डिस्ट्रिक्ट ३१३२ चे गव्हर्नर रो. जयेशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीएट लास्टिंग इंम्पॅक्ट या वर्षाच्या संकल्पनेनुसार क्लब विविध समाजोपयोगी उपक्रम प्रभावीपणे राबविणार आहे.

सन २०२६-२७ चे संचालक मंडळ – उपाध्यक्ष रो.मनीष बोरा, संयुक्त सचिव व प्रेसिडेंट-इलेक्ट रो.संजय मुनोत, कोषाध्यक्ष रो. धीरज मुनोत, आय.पी.पी./सीएसआर रो. सुनील कटारिया, सार्जंट-ॲट-आर्म्स रो.सतीश कटारिया, सार्वजनिक प्रतिमा व क्लब लर्निंग फॅसिलिटेटर संचालक रो.ईश्वर बोरा, क्लब प्रशासन व क्लब ॲक्शन प्लॅन चॅम्पियन रो. प्रसन्न खाजगीवाले, टीआरएफ/ग्लोबल ग्रँट संचालक रो. हरीश नय्यर, सभासदत्व व फेलोशिप संचालक रो.चेतन अमरापूरकर, समाजसेवा प्रकल्प संचालक रो.गिरीश मुळे, वैद्यकीय सेवा संचालक रो.डॉ. दिलीप बागल, व्यावसायिक सेवा संचालक रो.विजय जुंद्रे, पोलिओ प्लस संचालक रो.डॉ. श्रेया खाजगीवाले, मानव सेवा संचालक रो.राजीव गुजर, साक्षरता व विंन्स संचालक रो. राजेश परदेशी, विविधता, समता व समावेशन (डीईआय) संचालक रो.अजय गांधी, बुलेटिन संपादक रो. डॉ.कुणाल कोल्हे, आंतरराष्ट्रीय सेवा संचालक रो.हितेश गुप्ता, युवा सेवा संचालक रो.निलेश मेहेर, आयटी संचालक रो.अतुल बोरा, आर.आय. एम्फॅसिस संचालक रो.दत्ता दीक्षित, डिस्ट्रिक्ट एम्फॅसिस संचालक रो.उमेश रेखे, क्रीडा संचालक रो.अभिजित कोठारी., सल्लागार समिती : रो.डॉ. श्रीकृष्ण व्ही. जोशी व पीडीजी रो. शिरीष रायते.

नवनिर्वाचित अध्यक्ष रो.अमर गुरप याप्रसंगी म्हणाले, रोटरी ही केवळ एक संस्था नसून समाजपरिवर्तनाची प्रभावी चळवळ आहे. क्रीएट लास्टिंग इंम्पॅक्ट' या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवून रोटरीच्या सेव्हन एरियास ऑफ फोकस अंतर्गत शांतता व संघर्ष प्रतिबंध, रोगप्रतिबंध व उपचार, स्वच्छ पाणी, स्वच्छता व आरोग्य, माता व बाल आरोग्य, मूलभूत शिक्षण व साक्षरता, समुदायाचा आर्थिक विकास आणि पर्यावरण संवर्धन या सातही क्षेत्रांत परिणामकारक, शाश्वत आणि लोकाभिमुख सेवा प्रकल्प राबविण्याचा आमचा संकल्प आहे. सर्व ज्येष्ठ रोटेरियन, संचालक मंडळ व सदस्यांच्या सहकार्याने रोटरीची सेवा समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवून अहिल्यानगरमध्ये एक आदर्श सेवा कार्य उभे करू.

नवनिर्वाचित सचिव रो.सुनील मुथा म्हणाले, क्लबचे सचिव म्हणून मिळालेली जबाबदारी माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. अध्यक्ष रो. अमर गुरप यांच्या नेतृत्वाखाली पारदर्शक, शिस्तबद्ध आणि परिणामकारक प्रशासन देण्यासाठी मी कटिबद्ध आहे. प्रत्येक सेवा प्रकल्पाचे प्रभावी नियोजन, वेळेवर अंमलबजावणी, सदस्यांचा सक्रिय सहभाग आणि उत्कृष्ट संवाद यावर भर देत क्लबचे प्रत्येक कार्य अधिक यशस्वी करण्याचा प्रयत्न राहील. सर्व सदस्यांना सोबत घेऊन क्रीएट लास्टिंग इंम्पॅक्ट' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवून हे वर्ष क्लबच्या इतिहासातील सर्वोत्कृष्ट वर्ष ठरविण्याचा आमचा निर्धार आहे.

# खेळाडूंसाठी मोफत दंत तपासणी शिबिरास प्रतिसाद



विद्यार्थी खेळाडूंसाठी मोफत दंत तपासणी व जनजागृती शिबिरात तपासणी करताना डॉ. गणेश नजन व डॉ. सौ. रत्ना नजन आदी.

नगर – श्री रामावतार मानधना चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महावीर मल्लखांब आणि योगा ट्रेनिंग सेंटर व साई डेंटल क्लिनिक, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी खेळाडूंसाठी मोफत दंत तपासणी व जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये योगासन व मल्लखांब या क्रीडा प्रकारातील सुमारे १०० खेळाडूंची दंत तपासणी करण्यात आली. यावेळी डॉ. गणेश नजन व डॉ. सौ. रत्ना नजन यांनी खेळाडूंना दातांची योग्य निगा कशी राखावी, तोंडाच्या स्वच्छतेचे महत्त्व, योग्य आहार तसेच नियमित दंत तपासणीची आवश्यकता याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

शिबिराच्या समारोपप्रसंगी सहभागी डॉक्टरांचा ट्रस्टचे ट्रस्टी मोहन मानधना यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी त्यांनी अशा आरोग्यविषयक उपक्रमांमुळे खेळाडूंच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे सांगत या उपक्रमाचे कौतुक केले. या शिबिरामुळे खेळाडूंमध्ये दंत आरोग्याबाबत जागरूकता निर्माण झाली असून, उपस्थित विद्यार्थी व पालकांनी या उपक्रमाचे स्वागत करून आयोजकांचे आभार मानले.

याप्रसंगी सेंटरचे मुख्य प्रशिक्षण उमेश झोटिंग, आप्पा लाढाणे, अक्षय पावडे, डॉ. स्नेहा हराळ, डॉ. जोशना जगतकर, डॉ. नेहा पैठणकर त्यांच्यासमवेत पालक वर्ग उपस्थित होता.



वासन टोयोटाच्या श्रीगोंदा येथील शोरूमला आ. विक्रमसिंह पाचपुते, माजी मंत्री बबनराव पाचपुते व श्रीगोंदा नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष सुनीताताई खेतमाळीस यांनी नगरसेवकांसह सदिच्छा भेट दिली. यावेळी शोरूमचे जनक आहुजा आणि अनिश आहुजा यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत करत त्यांचा सत्कार केला.

# वासन टोयोटा शोरूमला आमदार विक्रमसिंह पाचपुते यांची भेट

नगर – वासन टोयोटाच्या श्रीगोंदा येथील शोरूमला आमदार विक्रमसिंह पाचपुते, माजी मंत्री बबनराव पाचपुते व श्रीगोंदा नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष सुनीताताई खेतमाळीस यांनी नगरसेवकांसह सदिच्छा भेट दिली. यावेळी शोरूमचे जनक आहुजा व अनिश आहुजा यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत करत त्यांचा सत्कार केला. या भेटीदरम्यान उपस्थितांनी शोरूमची पाहणी करून नवीन वाहनाचे वितरण देखील केले.

यावेळी नगरसेवक राजेंद्र खेडकर, पल्लवी पांडुरंग पोटे, मच्छिंद्र दत्तात्रय शिंदे, सुशील कुमार गुलाबराव, चांदणी दिलीप खेतमाळीस, वंदनाताई संग्राम घोडके, सुनीता अनिल घोडके, सोनाली सागर गोरे, अलका सुनील अनभुले, मनीषा विठ्ठल आनंदकर, शहाजी तुकाराम खेतमाळीस, प्रशांत मिठू गोरे यांच्यासह, राजू उखांडे, प्रशांत दरेकर, विकास बोरुडे, हरीश ढवण, राहुल पुरी, ज्ञानदेव खेतमाळीस, धनंजय कोथांबीरे, शोरुमचे सुशील ढवण, सौरभ श्रोत्री, अविनाश अडोळकर, प्रविण जोशी, खेतमाळीस आदी उपस्थित होते.

जनक आहुजा आणि अनिश आहुजा यांनी आभार मानत ग्राहकांना उत्कृष्ट सेवा आणि जागतिक दर्जाचा वाहन खरेदीचा अनुभव देण्यासाठी वासन टोयोटा कटिबद्ध असल्याचे सांगितले

# पहिल्या अहिल्यानगर जिल्हा पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत दैदिप्यमान कामगिरी

### नेक्स्ट लेव्हल फिटनेसचा सोहम गड्डम ठरला 'स्ट्राँग मॅन



पहिल्या अहिल्यानगर जिल्हा पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये नेक्स्ट लेव्हल फिटनेसच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकांची कमाई केली. यामध्ये सोहम गड्डम याने तब्बल 'स्ट्राँग मॅन' हा मानाचा किताब पटकावून स्पर्धेचे प्रमुख आकर्षण ठरला.

नगर – पहिल्या अहिल्यानगर जिल्हा पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये नेक्स्ट लेव्हल फिटनेसच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकांची कमाई केली. यामध्ये सोहम गड्डम याने तब्बल ४८७.५ किलो वजन उचलत 'स्ट्राँग मॅन' हा मानाचा किताब पटकावून स्पर्धेचे प्रमुख आकर्षण ठरला. नुकत्याच नेक्स्ट लेव्हल फिटनेस येथे पार पडलेल्या स्पर्धेचे उद्घाटन नगरसेवक करण कराळे यांच्या हस्ते झाले. जिल्ह्यातील विविध भागांतील पॉवरलिफ्टिंगपटूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला.

स्पर्धेतील सब-ज्युनियर गटात नेक्स्ट लेव्हल फिटनेसच्या जान्हवी रुपेश गायकवाड, तुबा अस्मिर सय्यद, साहिल कासोटे, सार्थक गाडे, सोहम गड्डम आणि फहाद पठाण यांनी आपल्या-आपल्या वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. तर मयांक कनोजिया याने रौप्यपदक आणि अर्णव इंगवले याने कांस्यपदक मिळविले.

ज्युनियर गटात याज्ञा लांडगे आणि हर्षल गाडे यांनी सुवर्णपदकाची कमाई केली. वरिष्ठ गटात स्वामिनी काकडे हिने सुवर्णपदक जिंकले, तर मास्टर-१ गटात अर्चना काळे यांनी सुवर्णपदक पटकावत आपला ठसा उमटविला.

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट कामगिरी करत सोहम गड्डम याने एकूण ४८७.५ किलो वजन उचलून 'स्ट्राँग मॅन' हा प्रतिष्ठेचा किताब आपल्या नावावर केला. या खेळाडूंना अहिल्यानगर पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे अध्यक्ष डेव्हिड मकासरे, विजय कनोजिया, ओंकार गुररम आणि रुपेश गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

२७ जूनला मुंबई येथे झालेल्या महापौर चषक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेतही नेक्स्ट लेव्हल फिटनेसच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश मिळविले. अस्मिरोद्दीन सय्यद याने सुवर्णपदक, ऋषी काळसे, वैभव दुधे आणि याज्ञा लांडगे यांनी रौप्यपदके पटकावत संस्थेच्या यशात आणखी भर घातली. या यशाबद्दल खेळाडूंचा नेक्स्ट लेव्हल फिटनेसचे संचालक व प्रशिक्षक ओंकार गुरम, विजय कनोजिया तसेच सदस्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# धम्माल मनोरंजन

## सुविचार



नावे ठेवणे सोपे असते पण नाव कमविणे कठीण असते.

## दिनविशेष ०३ जुलै

१६८३ : एडवर्ड यंगफ इंग्लिश कवी यांचे जन्म.
१८३८ : मामा परमानंदफ पत्रकार, प्रार्थना समाजाचे एक संस्थापक यांचा जन्म. (मृत्यू: १३ सप्टेंबर १८९३)
१८८६ : रामचंद्र दत्तात्रय रानडे आधुनिक विद्याविभूषित तत्त्वज्ञ व संत, फर्ग्युसन व विलींग्डन महाविद्यालयातील तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक यांचा जन्म. (मृत्यू: ६ जून १९५७)
१९०९ : बॅरिस्टर व्ही. एम. तारकुंडेफ कायदेपंडित, स्वातंत्र्यसैनिक, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश व सर्वोच्च न्यायालयात सामाजिक समस्यांसाठी लढा देणारे झुंजार कायदेतज्ञ यांचा जन्म. (मृत्यू: २२ मार्च २००४)
१९१२ : श्रीपाद गोविंद नेवरेकर मराठी रंगभूमीवरील लोकप्रिय गायक व नट यांचा जन्म. (मृत्यू : १६ जून १९७७)
१९१४ : दत्तात्रय गणेश गोडसे इतिहासकार, नाटककार, कलादिग्दर्शक, वेशभूषाकार आणि नेपथ्यकार यांचा जन्म. (मृत्यू : ५ जानेवारी १९९२)
१९१८ : व्ही. रंगारा राव भारतीय अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते यांचा जन्म. (मृत्यू : १८ जुलै १९७४)
१९२४ : सेल्लप्पन रामनाथन तामीळवंशीय राजकारणी, सिंगापूरच्या प्रजासत्ताकाचे ६वे राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.
१९२४ : अर्जुन नायडू भारतीय क्रिकेटपटू यांचा जन्म.
१९२६ : सुनीता देशपांडे लेखिका स्वातंत्र्य सैनिक यांचा जन्म. (मृत्यू : ७ नोव्हेंबर २००९)
१९५१ : सररिचर्ड हॅडली न्यूझीलंडचा क्रिकेट खेळाडू यांचा जन्म.
१९५२ : अमित कुमार भारतीय गायक यांचा जन्म.
१९५२ : रोहिनटन मिस्त्री भारतीय कॅनेडियन लेखक यांचा जन्म.
१९६२ : टॉम क्रूझ प्रसिद्ध हॉलिवूड अभिनेता यांचा जन्म.
१९७१ : ज्युलियन असांज विकीलीक्स चे संस्थापक यांचा जन्म.
१९७६ हेन्री ओलोंगा झिम्बाब्वेचे क्रिकेटपटू यांचा जन्म.
१९८० : हरभजन सिंग भारतीय क्रिकेटपटू यांचा जन्म.
१९८४ : भारती सिंगफ भारतीय विनोदी कलाकार यांचा जन्म.
मृत्यू :१३५० : संत नामदेव यांनी समाधी घेतली. (जन्म : २९ ऑक्टोबर १२७०)
१९३३ : हिपोलितो ग्रिगोयेन अर्जेंटिनाचे राष्ट्राध्यक्ष यांचे निधन. (जम : १२ जुलै १८५२)
१९३५ : आंद्रे सीट्रोएन सिट्रोएन कंपनीचे संस्थापक यांचे निधन. (जन्म : ५ फेब्रुवारी १८७८)
१९६९ : ब्रायन जोन्स द रोलिंग स्टोन्सचे संस्थापक, गिटार, हार्मोनिका आणि पियानो वादक यांचे निधन. (जन्म : २८ फेब्रुवारी १९४२)
१९९६ : राजकुमार हिंदी चित्रपट अभिनेता यांचे निधन. (जन्म : ८ ऑक्टोबर १९२६)

## महाशब्दकोडे

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ | ■ | ५ | | | ६ | ७ | ८ | ■ |
| | ■ | ९ | | | १० | | ■ | ■ | ११ | | | |
| १२ | १३ | | ■ | १४ | | | १५ | | ■ | ■ | | ■ |
| १६ | | | ■ | ■ | | ■ | | ■ | १७ | ■ | ■ | १८ |
| | ■ | ■ | १९ | | ■ | २० | ■ | २१ | | २२ | | |
| ■ | २३ | | | ■ | २४ | | २५ | | ■ | | ■ | ■ |
| २६ | | ■ | २७ | २८ | | ■ | २९ | | ■ | ३० | ३१ | |
| ३२ | | | ■ | ३३ | | ३४ | ■ | ■ | ३५ | | | ■ |
| ३६ | | ■ | ३७ | | ■ | | ■ | ३८ | | | | ३९ |
| ४० | | ■ | ■ | | ■ | ४१ | | | | ■ | ४२ | |
| ■ | ■ | ४३ | ४४ | ■ | ४५ | | ■ | | ■ | ४६ | | ■ |
| ४७ | ४८ | ■ | ४९ | ५० | | ■ | ५१ | | ५२ | | ■ | ५३ |
| ५४ | | | ■ | ५५ | | | | ■ | ५६ | | | |

### आडवे संकेत

१) निष्फळ प्रयत्न
५) शोले चित्रपटातील ठाकुर
९) आज्ञापत्र, होकार
११) आसनाचा एक प्रकार
१२) घोड्यावरुन पाहणी
१४) अतिशय श्रीमंत मनुष्य
१६) अपयशी होणे
१९) ख्रिस्तधर्मप्रचारक
२१) चर्चा, काथ्याकुट
२३) टरफल, पापुद्रा
२४) लाडात वाढलेली
२६) सारखा
२७) एक लोखंडी पात्र
२९) एका जातीचे नाव
३०) आडव्या उभ्या रेषांचा स्तंभ
३२) इंद्राचा सारथी
३३) लहान खणांची पिशवी
३५) एक आडनाव
३६) जरब ३७) उद्योग
३८) कमी भरणे
४०) पाण्याचा प्रवाह
४१) रुचकर
४२) गती ४३) एक फळ
४५) वाकलेला
४६) दिवस
४७) एक पातळ खाद्य पदार्थ
४९) आवश्यकता
५१) मत देणारा
५४) समुद्र
५५) लोकमत
५६) नव्याने आलेला

### उभे संकेत

१) चाली, रुढी
२) नांगराचा हातातला लहान आसुड
३) भिती ४) शरीफ (मुसलमानी नाव) ५) जैकी श्रॉफ, माधुरीचा एक चित्रपट ६) लव XX ७) खवा ८) मेघ
१०) एक चित्रपट नटीचे नाव
१३) उसाचा तुकडा
१५) जंगल, जमीन
१७) गजाआड
१८) नाद, कैफ, छंद
१९) पचविणारा
२०) मिशा काढणारा, षंड
२१) अमंगळ २२) विचार करणारा
२३) रोड, अशक्त २४) उजेड (इं.)
२५) तोंडात धरुन वाजविण्याचे एक साधन २६) शांती, तृप्ती
२८) डौलदार ३१) ऐन तिन्ही सांजेची वेळ ३४) क्षणिक झंझावत
३५) एक वन्य पशू
३८) क्वचित ३९) अंबाडीच्या झाडाचा वाख ४४) उद्यान ४५) दबाव
४६) थवा, एक हिंदी चित्रपट
४७) कशा प्रकारचा
४८) रास, उंचवटा५०) सुक्ष्म अंश
५१) विचार ५२) देणगी
५३) साधु, ऋषी

### मागील उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वि | ज | या | द | श | मी | ■ | गी | ता | र | ह | स्य | ■ |
| ह | ळ | द | ■ | व | न | क | र | ■ | ख | ट | ■ | ■ |
| ग | म | वि | णे | ■ | ■ | ळी | ■ | प | र | को | ट | ■ |
| ■ | ट | ■ | ■ | वि | ट | ■ | क | ण | ख | र | ■ | ■ |
| दे | ■ | का | र | खा | न | दा | र | ■ | ■ | ■ | ख | ल |
| व | ज | न | दा | र | ■ | ल | ■ | ख | ब | द | डी | ■ |
| गि | ■ | ■ | ड | ■ | उ | मे | श | ■ | र | व | ■ | सा |
| री | वा | ज | ■ | स | र | का | री | पा | हु | णा | ■ | र |
| ■ | ■ | य | ■ | ■ | क | ला | र | ■ | कु | ■ | हि | णे |
| सा | व | ज | ■ | पि | णे | ■ | ■ | सा | म | सु | म | ■ |
| त | ■ | य | मु | ना | ■ | पा | ल | व | ■ | खा | ■ | ■ |
| प | ■ | का | र | क | ■ | म | ■ | का | ला | व | धी | ■ |
| ट | प | र | णे | ■ | फु | र | फु | री | ■ | ह | र | क |

१) कोणत्या फळामध्ये पेक्टीनचे प्रमाण भरपूर असल्याने त्यापासून जेली तयार होते?
अ)डाळींबब) आंबा क)केळी ड)कवठ
२) कोणत्या अणुची पहिली कक्षा हिच बाह्यतम कक्षा असते?
अ)निऑन ब)हेनिअम क)क्रिप्टॉन ड)ऑरगॉन
३) महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी कोणत्या नदीस म्हणतात?
अ)वर्धा ब)कोयना क)ब्रम्हपूत्रा ड)इरई
४) महाराष्ट्रात कुंभमेळा सिंहस्थ कोठे भरतो?
अ)त्र्यंबकेश्वर ब)ओंकारेश्वर क)कौंडण्यपूर ड)तुळजापूर
५) कोणत्या जातीच्या केळीच्या खुंटावर तपकीरी ठिपके असतात?
अ)राजेळीब)सुकेळी क)लालकेळी ड)लालवेलची
६) खालीलपैकी कोणते झाड तुलनेने थोड्या काळात दर्जेदार जळण लाकूड देते?
अ)निंब ब)आंबा क) डाळींब ड)बाभूळ
७) महाराष्ट्रातील कोणत्या जिल्ह्यात बीळाशिळा सत्याग्रह झाला?
अ)सातारा ब)नागपूर क)नाशिक ड)यवतमाळ
८) झाड वाकवीने किंवा फांद्या वाकविणे हे व्यवस्थापन काम खालीलपैकी कोणत्या फळझाडाकरिता करतात?
अ)संत्री ब)आंबा क)सीताफळ ड)पेरु




९) अ आणि ब अनुक्रमे एक काम १२ दिवसात, ब आणि क मिळून तेच काम १५ दिवसात, तर क आणि अ तेच काम २० दिवसात पूर्ण करतात तर एकटा ब तेच काम किती दिवसात पूर्ण करेल?
अ)९ दिवस ब)१६ दिवस क)२०दिवस ड) २२ दिवस
१०) सौम्या स्वामीनाथन ह्या कशाची संबंधीत आहेत?
अ)कबड्डी ब)जलतरण क)बुद्धीबळ ड) क्रिकेट
११) महाराष्ट्र विधान परिषदेत स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रतिनिधीत्व किती असते?
अ)२/३ ब)१/२ क)३/४ ड)१/३
१२) कसारा घाट कोणत्या शहरास जातांना लागतो?
अ)सातारा ब)मुंबई क)औरंगाबाद ड)कोल्हापूर
१३) कोणत्या हंगामात येणाऱ्या अंजीराच्या बहराला खत बहार म्हणतात?
अ)वसंत ब)हिवाळा क)उन्हाळाड)पावसाळा
१४) कोणत्या प्रकारच्या जमिनीत लोक व ॲल्युमिनीयम प्रमाण सर्वात जास्त असते?
अ)गाळाची मृदा ब)काळी मृदा क)तांबडी मृदा ड) जांभी मृदा
१५) समुद्राकाठच्या दलदलीच्या प्रदेशात कोणत्या प्रकारची जंगले आढळतात?
अ)मॅंग्रूव्ह ब)पानझडी वृक्ष
क)उंच व दाटीने वाढणारे वृक्ष ड) काटेरी वनस्पती
१६) कृषी मालाची प्रतवारी कोणत्या चिन्हाद्वारे निश्चित करण्यात येते? अ)ऐगमार्क ब)राजमुद्रा
क)आयएसआय ड) यापैकी नाही
१७) कडुलिंबाच्या बियातील कोणत्या द्रव्यात किटकनाशक गुणधर्म आहेत?
अ)असाडक्टीम ब)ॲझाडिरॅक्टीन क)अझाइन्डीकन ड) ॲसिटिलीन
१८)केळीच्या कोणत्या नामांकित जातीला मसाल्यासारखी चव असते?
अ)सफेद वेलची ब)राजेळी क)लाल केळी ड) सुकेळी
१९) ऊस पिकासाठी सर्वोत्कृष्ट उपयोग युक्त सिंचनासाठी रानबांधणी पद्धती कोणती होय?
अ)प्रवाही पद्धती ब)सारा पद्धती
क)वाफे पद्धती ड) यापैकी नाही
२०) महाराष्ट्रात पानवेल संशोधन केंद्र कोणत्या ठिकाणी आहे? अ)पुणे ब)बडगणे क)दिग्रस ड) डिग्रस
२१)महाराष्ट्रातील जंगलात सर्वात जास्त कशाचे उत्पादन होते?
अ)लाकुड ब)गवत क)बांबू ड)लाख
२२)डिझेल इंजिनचे कारखाने सर्वात जास्त कोठे आहेत?
अ)सातारा ब)कोल्हापूर क)पुणे ड)सांगली
२३) पेशव्यांची राजधानी कोणती?
अ)रायगड ब)औरंगाबाद क)शनिवारवाडा ड) पुणे
२४) चीनी मातीच्या वस्तू निळ्या रंगाने रंगविण्यासाठी काय वापरतात? अ)कॉपर ऑक्साईड ब)कोबाल्ट ऑक्साईड क)क्युप्रस ऑक्साईड ड)आयर्न ऑक्साईड

उत्तरः (१-ड), (२-ब), (३-क), (४-अ), (५-अ), (६-ड), (७-अ), (८-अ), (९-ड), (१०-क), (११-ड), (१२-ब), (१३-ड), (१४-ड), (१५-अ), (१६-अ), (१७-ब), (१८-क), (१९-ब), (२०-ड), (२१-क), (२२-ब), (२३-क), (२४-ब)

**अल्पबुद्धी बहुगर्वी.**
अर्थ- कमी बुद्धीच्या माणसास गर्व अधिक असतो.
**अतिराग भीक माग.**
अर्थ- अतिरागाने एखादे कृत्य केले तर त्याचा दुष्परिणाम होतो.
**अंगावरचे लेणे, जन्मभर देणे.**
अर्थ- दागिन्याकरिता कर्ज करुन ठेवायचे आणि ते जन्मभर फेडीत बसायचे.
**अति झाले, असू आले.**
अर्थ- एखाद्या गोष्टीचा अतिरेक झालाकी ती दु:खदायी ठरते..

## फिल्मी शब्दकोडे



| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | | ३ | | ४ | | | ■ | ■ | ■ |
| | ■ | | ■ | ■ | | ■ | | ■ | ■ | ■ | ५ | |
| | ■ | | ■ | ■ | | ■ | ६ | | | ■ | | ■ |
| | ■ | | ■ | ■ | | ■ | | ■ | ■ | ■ | | ■ |
| | ■ | ७ | | ■ | | ■ | | ■ | ८ | | | |
| | ■ | | ■ | ९ | | | ■ | ■ | | ■ | | ■ |
| | ■ | | ■ | | ■ | ■ | ■ | ■ | | ■ | | ■ |
| | ■ | १० | | | | ११ | ■ | ■ | | ■ | | ■ |
| | ■ | | ■ | ■ | ■ | १२ | | | | | | ■ |
| ■ | १३ | | | १४ | ■ | ■ | ■ | ■ | | ■ | ■ | ■ |
| १५ | ■ | | ■ | | ■ | १६ | | १७ | ■ | ■ | १८ | |
| | ■ | | ■ | १९ | | | ■ | २० | | | | ■ |
| २१ | | ■ | २२ | | ■ | | ■ | | ■ | ■ | २३ | |

### आडवे संकेत

१) अजय देवगन, सलमान खान और ऐश्वर्या रॉय की एक फिल्म.
५) अरे वो सांभा कितने आदमी थे रे.. यह डायलॉग इस फिल्म का है.
६) सन् १९९१ में अनिल शर्मा निर्देशित इस फिल्म में विनोद खन्ना और श्रीदेवी थे.
७) XX का कर्ज (फिल्म)
८) सन् १९९८ में राजसिखी निर्देशित इस फिल्म में अक्षय खन्ना और उर्मिला मातोंडकर थे.
९) सन् १९९१ में रमेश सिप्पी निर्देशित इस फिल्म में अमिताभ बच्चन और अमृता सिंह थे.
१०) सन् १९७७ में ए. भिम सिंह निर्देशित इस फिल्म में शत्रूघ्न सिन्हा और लिना चंदावरकर थे.
१२) अख्खा इंडिया जानता है हम तुमपे मरता है क्या चीज है जानम अपनी XXXXXXXX करता है.....
१३) सन् १९९४ में डेविड धवन निर्देशित इस फिल्म में गोविंदा और करिश्मा कपूर थे.
१६) सन् १९८० में राज खोसला निर्देशित इस फिल्म में अमिताभ बच्चन और जिनत अमान थे.
१८) सनी देओल, सलमान खान, तब्बू और करिश्मा कपूर की एक फिल्म.
१९) टि. रामाराव निर्देशित इस फिल्म में अनिल कपूर और रविना टंडन थे.
२०) सन् १९९५ में राजीव मेहरा निर्देशित इस फिल्म में शाहरुख खान और जुही चावला थे.
२१) सन् १९९५ में समीर गांगुली निर्देशित इस फिल्म में शत्रूघ्न सिन्हा और लिना चंदावरकर थे.
२२) सन् १९९९ में इ. निवास निर्देशित इस फिल्म में मनोज वाजपेयी और रविना टंडन थे.
२३) गाडी बुला रही है सीटी बजा रही है.... यह गाना इस फिल्म का है.

### उभे संकेत

१) सन् १९८१ में दिपक बाहरी निर्देशित इस फिल्म में मिथून चक्रवर्ती और रंजीता थे.
२) सन् १९९५ में आदित्य पांचोली निर्देशित इस फिल्म में शाहरुख खान और काजोल थे.
३) सन् १९७५ में ऋषीकेश मुखर्जी निर्देशित इस फिल्म में अमिताभ बच्चन और जया भादूरी थे.
४) सन् १९९९ में जॉन मैथ्यू निर्देशित इस फिल्म में आमिर खान और सोनली बेंद्रे थे.
५) सन् १९९२ में डेविड धवन निर्देशित इस फिल्म में गोविंदा और दिव्या भारती थे.
८) लव के लिए XXXXXXXXXX (फिल्म)
९) XXX याज्ञीक (गायीका)
११) XX मुराद (नायक)
१४) कैद में है XXXX (फिल्म)
१५) सन् १९८६ में फिरोज खान निर्देशित इस फिल्म में श्रीदेवी, फिरोज खान, अनिल कपूर और डिम्पल कपाडिया थे.
१६) XXX मिल रहे है मगर चुपके...
१७) सन् १९९४ में बनी इस फिल्म में अतुल अग्निहोत्री, सोनली बेंद्रे थे.
१८) सन् १९९० में रामेश सेठी निर्देशित इस फिल्म में जैकी श्रॉफ और सोनम थे.

### मागील फिल्मी उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दे | व | दा | स | ■ | रा | ■ | रा | जी | व | क | पू | र |
| व | ■ | ■ | ■ | सा | ज | न | ■ | ■ | त | ■ | ■ | ह |
| आ | नं | द | ब | क्षी | ■ | म्र | ■ | ■ | न | ज | रा | ना |
| नं | ■ | ले | ■ | ■ | ■ | ता | ■ | स | ■ | मि | ■ | है |
| द | रा | र | ■ | शि | ल्पा | शि | रो | ड | क | र | ■ | ■ |
| ■ | ज | ■ | दा | वा | ■ | रो | ■ | क | ■ | ■ | ना | ■ |
| मु | कु | ल | ■ | क्र | ■ | ड | र | ■ | अ | वि | ना | श |
| ■ | मा | ■ | ■ | इं | ■ | क | ■ | टि | नु | ■ | पा | ■ |
| घ | र | ■ | प्या | सा | ■ | र | वि | ना | ■ | प | टे | ल |
| र | ■ | ई | ■ | फ | र्ज | ■ | ■ | मु | न | ■ | क | ■ |
| मे | रा | ना | म | ■ | ■ | भ | र | नी | ■ | क | र | ण |
| रा | ■ | मि | ■ | आ | र | ती | ■ | म | ■ | स | ■ | ■ |
| म | हि | ना | ■ | प | ■ | जा | न | ■ | ह | म | रा | ज |

## विनोद



ऐन मध्यरात्री दोन इसमांची अचानक गाठ पडली. एकाने विचारले, 'दोस्ता, कसं काय?
इकडे कुठं? इतक्या रात्री भटकतोस याबद्दल तुझी बायको तुला काहीच बोलत नाही?
'माझं लग्नच झालेलं नाही'
यावर पहिला म्हणाला, म्हणतोस? लग्नच झालं नाही? मग, एवढया रात्री कशाला भटकतोस?

--------------------

तुम्हाला असं वाटतं का की, 'लग्न ही एक लॉटरी आहे?'
'नाही, अजिबात वाटत नाही।'
'काय?'
'कारण लॉटरीत दुसऱ्यांदा नशीब अजमविण्याची संधी मिळते.'

## चारोळी

मलाही वाटतं झोपाळ्यावर
अलगद झुलावं
तू व्हाव भ्रमर
अन मी फुलासारख फुलावं.

